७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. ०९ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०४६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## कुटुंबावर दु:खाचा डोंगर, आजोबांचं नातवांना मार्गदर्शन

पुणे (दै. संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार आणि पार्थ पवार यांचा बारामतीमधील एक फोटो समोर आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान दुर्घटनेत 28 जानेवारीला निधन झालं. यामुळं पवार कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनला उपस्थित न राहता बारामतीत थांबण्याचा निर्णय घेतला आहे. शरद पवार, रोहित पवार आणि पार्थ पवार यांचा आजचा एक फोटो समोर आला आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर सांत्वनपर भेटीसाठी बारामतीतील नागरिक भेट देत होते. आज या सांत्वनपर भेटीचा शेवटचा दिवस होता. बारामतीमधील सहयोग बंगला येथे आज शरद पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पवार कुटुंबातील इतर सदस्य देखील सांत्वनपर भेटीसाठी उपस्थित होते.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

#### अन् जेजुरी गडावर एकच गोंधळ!

पुणे (दै. संध्या) : जिल्ह्यातील प्रसिद्ध खंडोबा देवस्थान असलेल्या जेजुरी गडावर रविवारी सकाळी घडलेल्या एका घटनेमुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. शर्यतीची बैलं पूजेसाठी गडावर आणण्यात आली असताना त्यापैकी एक बैल अचानक उधळल्याने भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. याप्रकरणी अधिक माहिती अशी की, काही शेतकरी आणि बैलगाडा शर्यतीचे शौकीन यांनी आपल्या बैलांना खंडोबा देवाचे दर्शन घडवण्यासाठी जेजुरी गडावर आणले होते. दर्शनासाठी पायऱ्यांवरून बैलांना नेत असताना अचानक एक बैल घाबरून उधळला. त्यामुळे गडावर दर्शनासाठी आलेल्या भाविकांमध्ये एकच पळापळ उडाली.

#### कारवाईला तात्पुरती स्थगिती

पुणे (दै. संध्या) : गर्भवती तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या विश्वस्तांविरुद्ध फौजदारी कारवाई सुरू करण्याच्या प्रक्रियेला मुंबई उच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. यासंदर्भात न्यायालयाने राज्य सरकारसह संबंधित सर्व यंत्रणांना नोटीस बजावत २१ फेब्रुवारीपर्यंत आपले उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. याप्रकरणी राज्य सरकारच्या निर्देशानुसार धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली होती. पुणे सहधर्मादाय आयुक्त कार्यालयाने सादर केलेल्या अहवालात रुग्णालयाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप नोंदवण्यात आला असून, विश्वस्तांविरुद्ध फौजदारी तक्रार दाखल करण्याची शिफारस करण्यात आली होती. या शिफारशीविरोधात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे विश्वस्त डॉ. उत्क्रांत कुर्लेकर आणि सचिन व्यवहारे यांनी मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्र रिट याचिका दाखल केल्या आहेत.

#### दोन लाखांची लाच घेताना जाळ्यात

पुणे (दै. संध्या) : लष्करी अभियांत्रिकी सेवा (एमईएस), खडकी येथे कार्यरत असलेल्या दोन अधिकाऱ्यांना केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) लाच घेतल्याप्रकरणी अटक केली आहे. सहायक गॅरिसन अभियंता सुनील निकम आणि कनिष्ठ अभियंता सुरेश म्हस्के अशी संशयित आरोपींची नावे आहेत.

# आगामी काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : येत्या २-३ महिन्यांत भविष्योन्मुख धोरणे आणणार



**नागपूर (दै. संध्या)**

येत्या काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर राहणार आहे. यासाठी आम्ही अनेक धोरणे आखली असली, तरी काही धोरणे जुनी झाली असल्याने भविष्यातील गरजा, बदल आणि आव्हाने लक्षात घेऊन येत्या दोन-तीन महिन्यात विविध क्षेत्रांतील भविष्योन्मुख (फ्युचर रेडी पॉलिसी) धोरणे आणली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.

असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटद्वारे आयोजित ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी इंटरनॅशनल बिझनेस कॉनक्लेव्हचे उद्घाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे जागतिक अध्यक्ष जितेंद्र जोशी, असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांच्यासह तब्बल २२ देशांचे राजदूत, उच्चायुक्त व बिझनेस प्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती होती. विशेष म्हणजे याच परिषदेत गुंतवणुकीचे तीन सामंजस्य करारही पार पाडण्यात आले. याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे सध्या वेगाने विकसित होणारे राज्य आहे. त्यातल्या त्यात विदर्भाचा प्रदेश झपाट्याने विकसित होत आहे. महाराष्ट्रात सामंजस्य करार केवळ कागदावर होत नसून ते प्रत्यक्षात साकारले जात आहेत. लॉजिस्टिक्स, एआय, सोलर क्षेत्रामध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. सर्वाधिक विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे.

राज्य सरकारने गेल्या काही महिन्यांमध्ये जीसीसी पॉलिसी, जेम्स अँड ज्वेलरी पॉलिसी, बांबू पॉलिसी जाहीर केली आहे. नवे औद्योगिक धोरण आले आहे. त्यानंतर आता सात नवीन धोरणांची घोषणा येत्या दोन-तीन महिन्यांत होणार आहे. यामध्ये टेक्सटाइल्स अँड ॲपरल, लेदर अँड फूटवेअर, इलेक्ट्रॉनिक्स अँड फॅब, एरोस्पेस अँड डीफेन्स, एमएसएमई, फार्मास्युटिकल बायोटेक अँड मेडिकल डीव्हायसेस, सर्क्युलर इकॉनॉमी, बायो प्लास्टिक या क्षेत्रांतील धोरणांचा समावेश असेल. या सातही धोरणांच्या निर्मितीचे काम सुरू असून येत्या तीन महिन्यांत ते जाहीर करण्यात येतील. यामुळे धोरणप्रेरित गुंतवणूक, उद्योगवाढ आणि आर्थिक विकास हेच महाराष्ट्राचं प्रमुख सूत्र ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.


सोलर मॉड्यूलच्या क्षेत्रात नागपूर क्षेत्रात येणारी गुंतवणूक ही देशातील सर्वात मोठी सोलर मॉड्यूल प्रोड्यूसिंग इकोसिस्टीम असून अद्यापही गुंतवणुकीचा ओघ मोठ्या प्रमाणात सुरुच आहे. कृषी प्रक्रियेसह अनेक निर्मितीक्षम क्षेत्रात नागपूर आणि विदर्भाची मोठ्या प्रमाणात आगेकूच सुरु आहे, अनेक क्षेत्रात गुंतवणुकीच्या नव्या संधी येत आहेत. अगदी गडचिरोलीसारख्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित होत असून भारताचे स्टील हब म्हणून ते पुढे येत आहे. पुढील दहा वर्षांत गडचिरोलीत पोलादनिर्मितीची सर्वाधिक मोठी क्षमता उभी राहणार आहे.

### दुसऱ्या दिवशी १०,८३१ कोटींचे सामंजस्य करार

ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी तीन महत्त्वाचे सामंजस्य करार झालेत. यामध्ये पहिला करार महामेट्रो आणि केअर हॉस्पिटलमध्ये झाला. यात कस्तुरचंद पार्कजवळ महामेट्रोच्या जागेवर पीपीपी मॉडेलवर आधारित सुमारे साडेतीनशेवर खाटांच्या बहुविशेषोपचार हॉस्पिटलचा समावेश असून त्यासाठी सुमारे सहाशे कोटींची गुंतवणूक होत आहे. या प्रकल्पातून सुमारे पंधराशे ते अठराशे रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे. दुसरा करार गॅलक्सी सोलर कंपनीसोबत झाला. कंपनीद्वारे १० हजार कोटींची गुंतवणूक करत सोलर सेल, बॅटरी स्टोअरेज सिस्टीमची निर्मिती होईल. या प्रकल्पाद्वारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असा सुमारे चार हजार रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे. तिसरा करार टेलिकॉम टॉवरची निर्मिती करणाऱ्या जीआर इन्फ्रास्ट्रक्चरसोबत झाला आहे. कंपनीने २०० कोटींची गुंतवणूक करण्याची घोषणा केली असून याद्वारे सुमारे पाचशे रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे.

## अटल सेतूवर खंडाळ्यासारखी दुर्घटना घडली तर?

**मुंबई (दै. संध्या)**



■ मिलिंद नार्वेकरांचा मुख्यमंत्र्यांना इशारा; हेलिपॅडसह सुसज्ज आपत्कालीन यंत्रणेची केली मागणी

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खंडाळा घाटात अलीकडेच झालेल्या गॅस टँकर अपघातामुळे महाराष्ट्रातील आपत्कालीन यंत्रणेच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. या घटनेतून बोध घेत, भविष्यात 'अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा सेतू' (अटल सेतू) वर कोणतीही मोठी दुर्घटना घडू नये, यासाठी तेथे तातडीने हेलिपॅड आणि सक्षम आपत्कालीन यंत्रणा उभारण्याची मागणी आमदार मिलिंद नार्वेकर यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र पाठवून तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्याची विनंती केली आहे. ३ फेब्रुवारी रोजी खंडाळा घाटातील आडोशी बोगद्याजवळ प्रोपोलिन गॅसचा टँकर उलटल्याने तब्बल ३६ तास वाहतूक ठप्प होती. योगायोगाने, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सांत्वनपर भेटीसाठी बारामतीकडे जाताना मिलिंद नार्वेकर स्वतः या वाहतूक कोंडीत अडकले होते.

## एकनाथ शिंदे पवारांसोबत अन् उद्धव ठाकरे फडणवीसांसोबत जाणार

**मुंबई (दै. संध्या)**


■ २०२९ च्या लोकसभा निवडणुकीबाबत लक्ष्मण हाकेंचं महत्त्वाचं भाकीत



आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्यावेळी म्हणजे 2029 मध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल पाहायला मिळतील. उद्धव ठाकरे हे पुन्हा भाजपसोबत जाऊ शकतात. तर सध्या सत्तेत असलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आपले सर्व शिलेदार घेऊन शरद पवार यांच्याशी युती करतील, असा खळबळजनक दावा ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी केला आहे. ते रविवारी सोलापूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी लक्ष्मण हाके यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून देणारे दावे केले. आगामी निवडणुकीत म्हणजे 2029 मध्ये एकनाथ शिंदे, शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस हे तीन पक्ष एका बाजूला असतील. तर भाजप आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना हे दोन पक्ष एकत्र येतील. राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला जनाधार उरलेला नाही. राज ठाकरे यांनी अनेकदा भूमिका बदलल्या आहेत. त्यामुळे राज ठाकरे यांनी आणखी काही वर्षे तयारी करण्याची गरज आहे, असे मत लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केले. भाजपपासून दूर गेलेले उद्धव ठाकरे हे पुन्हा एकदा भाजपसोबत आल्याचे चित्र 2029 मध्ये दिसेल असा खळबळजनक दावा हाके यांनी केला आहे. यामुळे महाराष्ट्राचे राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघेल आणि ह्याची सुरुवात नुकत्याच झालेल्या पंचायत राज निवडणुकीत दिसल्याचे हाके यांचे सांगणे आहे. सध्या सुरू असलेल्या पंचायत राज निवडणुकीत ज्या पद्धतीने आघाड्या झाल्या ते पाहता आता नवीन ध्रुवीकरणाला सुरुवात झाली असून 2029 मध्ये होणाऱ्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि भाजप हे एकनाथ शिंदे आणि दोन्ही राष्ट्रवादीच्या विरोधात एकत्र आलेले दिसतील असे भाकीत हाके यांनी केले आहे. ज्या पद्धतीने शिंदे सेनेचे मंत्री आणि नेते अलीकडच्या काळात वारंवार मुख्यमंत्री आणि भाजपला अडचणीत आणणारे वक्तव्य करताना दिसत आहेत. महापालिका नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीतही आपला विरोध करण्याची भूमिका एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची होती. अनेक ठिकाणी एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित आल्याचे चित्रही पाहायला मिळाले होते.

## अल्पवयीन धनिकपुत्राच्या कारने स्कुटीवरुन जाणाऱ्या जोडप्याला चिरडलं

**मुंबई (दै. संध्या)**



मुंबईत अल्पवयीन मुलाने भरधाव वेगात चालवलेल्या कारमुळे भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. विद्याविहार येथील सोमय्या कॉलेज गेट क्रमांक 3 समोर एका 17 वर्षीय अल्पवयीन मुलाने किया सेलटास कार चालवत स्कूटरला जोरदार धडक दिली. या अपघातात बाईकस्वार पती-पत्नी गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात 5 फेब्रुवारी रोजी उशिरा रात्री घडला. अपघातग्रस्त पती-पत्नींची नावे धुरमिल पटेल आणि मिनल पटेल अशी असून, दोघांवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, दोघांचीही प्रकृती अद्याप चिंताजनक असून पत्नीला गंभीर स्वरूपाची अंतर्गत इजा झाल्याची माहिती समोर येत आहे. अपघातास कारणीभूत ठरलेला चालक अल्पवयीन असून त्याचे वय अवघे 17 वर्षे आहे. संबंधित कार ही किया सेलटास असून, ती अत्यंत वेगात चालवली जात होती, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणी टिळक नगर पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलासह त्याच्या वडिलांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारचे मालक तथा आरोपी वडिलांचे नाव वालजी राजा भूषण असे आहे. अल्पवयीन मुलाला वाहन चालवण्यासाठी कार देणे आणि त्यातून झालेला अपघात याबाबत पोलिसांनी गंभीर दखल घेतली आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू केली असून, अपघाताचा नेमका वेग, निष्काळजीपणा आणि इतर बाबींचा सखोल तपास केला जात आहे. अल्पवयीनांकडून वाहन चालवण्याचे प्रकार वाढत असल्याने, या घटनेमुळे पालकांच्या जबाबदारीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## विधान परिषद हाच उद्धव ठाकरेंसमोरचा शेवटचा मार्ग?

**छ. संभाजीनगर (दै. संध्या)**



उद्धव ठाकरे यांना पुन्हा विधान परिषदेत जायचे असल्यास इतर पक्षांचा पाठिंबा आवश्यक आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस त्यांना विधान परिषद निवडणुकीत साथ देतात का, हे पाहावे लागेल. त्या पाठिंब्याशिवाय त्यांचे आमदार होणे शक्य नाही. उद्धव ठाकरे यांनी यापूर्वी विधान परिषदेवर निवड होऊन मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळली होती. मात्र सध्याच्या परिस्थितीत त्यांच्या समोर कोणतीही थेट निवडणूक उपलब्ध नाही. त्यामुळे सभागृहात जाण्यासाठी विधान परिषदेचा मार्ग हाच एकमेव पर्याय उरतो, असे मत मंत्री संजय शिरसाट यांनी व्यक्त केले आहे. महाविकास आघाडीबाबत बोलताना शिरसाट यांनी स्पष्ट केले की, काँग्रेसने अनेक ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवल्या आहेत. त्यामुळे महाविकास आघाडी आता अस्तित्वात राहिलेली नाही. काँग्रेसची शरद पवार गटासोबत जाण्याचीही इच्छा उरलेली नाही, तर उद्धव ठाकरे गटाला त्यांनी आधीच बाजूला केले आहे. आगामी काळात काँग्रेस स्वबळावरच राजकारण करेल, असेच चित्र दिसत आहे.

# अजित पवारांच्या विमानात सुसाईड बॉम्बर

## राष्ट्रवादीच्या आमदाराने व्यक्त केला संशय; पायलट सुमीत कपूर यांना संमोहित केल्याचाही दावा

**अकोला (दै. संध्या)**



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना ठार मारण्यासाठी त्यांच्या विमानात सुसाईड बॉम्बर अर्थात आत्मघातकी हल्लेखोराचा वापर करण्यात आल्याचा संशय सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी रविवारी व्यक्त केला आहे. अमोल मिटकरी सातत्याने अजित पवारांच्या मृत्यूवर संशय घेत आहेत. पण यावेळी त्यांनी थेट आत्मघातकी हल्लेखोराचा उल्लेख केल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. अजित पवार यांचा गत 28 जानेवारी रोजी बारामती विमानतळावर झालेल्या एका विमान अपघातात मृत्यू झाला होता. तेव्हापासून सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेससह विविध पक्षांच्या नेत्यांनी त्यांच्या मृत्यूवर संशय व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार अमोल मिटकरी यांनी रविवारी पत्रकारांशी संवाद साधताना पुन्हा एकदा अजित पवारांच्या निधनावर शंका घेतली आहे. ते म्हणाले, अजित पवार ज्या विमानाने प्रवास करत होते, त्या व्हीएसआर कंपनीचे पायलट दोनवेळा बदलण्यात आले होते. ते विमान अगोदरच नादुरुस्त होते. त्याच्यावर एक वर्षापासून बंदी होती. त्यानंतरही अजित पवारांना तेच विमान 28 तारखेला देण्यात आले.व्हीएसआर कंपनीने गत डिसेंबर महिन्यात आपल्या कंपनीच्या प्रत्येक वैमानिकाचा प्रत्येकी 50 कोटी रुपयांचा विमा उतरवला होता. जर 50 कोटींचा विमा उतरवला गेला असेल आणि जो पायलट ऐनवेळी बदलण्यात आला अन् त्याला हिप्नोटाईज केले होते का? त्याला आमिष दाखवण्यात आले होते का? अनेक ठिकाणी हिप्नोटाईज करून सुसाईड बॉम्बरचा वापर केला जातो, असे मिटकरी म्हणाले. अमोल मिटकरी यांनी आपल्या दाव्याखातर राजीव गांधी यांची हत्या व मुंबईवरील हल्ल्याचाही दाखला दिला. ते म्हणाले, अजमल कसाब यालाही दहशतवादी हल्ल्यासाठी पाठवण्यात आले होते.

## दोन्ही गट एकत्र यावे हे पवारांचे स्वप्न होते

### आमच्या पुढेच एकत्र येण्याची चर्चा झाली होती, अभिनेते सयाजी शिंदे यांचा दावा

**मुंबई (दै. संध्या)**



अभिनेते सयाजी शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येण्याची चर्चा आमच्या पुढेच झाली होती, असा दावा करत एकच खळबळ उडवून दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र यावेत हे अजित पवारांचे स्वप्न होते. आमच्यापुढेच एकत्र येण्याची चर्चा झाली होती, असे त्यांनी म्हटले आहे. अजित पवारांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा थंड बस्त्यात पडल्याचा दावा केला जात असताना सयाजी शिंदे यांनी हे विधान केले आहे हे विशेष.

सयाजी शिंदे यांनी रविवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यात त्यांनी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी एकत्र येण्याची भावना व्यक्त केली. ते म्हणाले, अजित पवारांनी सर्वधर्म समभाव घेऊन, गरीब - श्रीमंत न पाहता, सर्वकाही खूप पुढे घेऊन जाण्याचे ठरवले होते. मला असे वाटते की, त्यांचे हे स्वप्न आपण सगळ्यांनी स्पेशली सुनेत्रा वहिनी, सुप्रिया ताई व पवारांनी पुढे न्यायला पाहिजे. दोन्ही गट एकत्र यावेत हे दादांचे पहिले स्वप्न होते. त्यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण व्हावे अशी आमची इच्छा आहे. असे झाले तरच महाराष्ट्राची ताकद वाढेल.

महाराष्ट्राची ताकद वाढवायची असेल तर दोन्ही पवार कुटुंबांनी ताबडतोब एकत्र आले पाहिजे. त्यांचे काही कौटुंबीक इगो असतील किंवा त्यांच्या काही भावना असतील तर त्या त्यांनी बाजूला ठेवल्या पाहिजे, असे ते म्हणाले.

## संपादकीय

# आडवा टँकर

१७ टन ज्वालाग्रही वायू कोचीहून गुजरातला घेऊन जाणाऱ्या या टँकरला मार्गात आणखी शंभर प्रकारच्या अडचणी येऊ शकल्या असत्या. सामान्यांच्या जीवाला त्यातून असंख्य धोके उद्भवू शकले असते. अशा टँकरला रस्त्यावरून प्रवास करताना खबरदारी घेण्याची काही अट आहे की नाही? आधी 'इंडिगो' आणि आता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघाती कोंडीने पायाभूत सुविधा खासगी संस्थांच्या हाती किती प्रमाणात द्याव्यात, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. खासगीकरणानंतरच्या या सेवांच्या कार्यक्षमतेचं गुलाबी चित्र रंगवताना बहुतांश वेळा पाश्चिमात्य देशातील खासगी सेवांचा दाखला दिला जातो. तो पूर्णांशाने नसला, तरी काही प्रमाणात खरा असतो. त्याला कारण आहे, तिथले नागरिक आणि ग्राहक हक्क, विमा कंपन्यांचा विस्तार आणि गरज पडल्यास त्यांचे कान धरण्यासाठी तत्पर न्यायव्यवस्था आहे. आपल्याकडे यातलं काहीच नाही. तरीही वेगाने खासगीकरण; काही क्षेत्रात तर मक्तेदारीकरण सुरू आहे. अगदी सुरुवातीलाच असे अनेक धक्के बसले आणि धोके स्पष्ट दिसत असले, तरी देशात कोणीच जागं व्हायला तयार नाही, असं दुर्दैवाने दिसतं आहे. विविध क्षेत्रांतील खासगीकरणाचा टक्का वाढवताना त्या प्रमाणात नियंत्रक यंत्रणांना सक्षम आणि प्रभावी करणं आवश्यक आहे. आधी 'इंडिगो' आणि त्यानंतर मुंबई - पुण्यादरम्यानची वाहतूक कोंडी, नवी मुंबईतील नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर होत असलेली मोबाईल नेटवर्कची अडचण, खासगी बसचे देशभर सुरू असलेले भयानक अपघात... या मालिकेत भर टाकण्यासाठी आणखी कितीतरी दुर्घटना आहेत. पण, यातल्या कुठल्या घटनेने संबंधित क्षेत्राची नियंत्रण यंत्रणा बळकट केली गेली? असा प्रश्न विचारला, तर त्याचं उत्तर देण्यासाठी मुद्दलात काहीही नाही! कफ सिरप प्रकरणातील एका बालकाचा २२८ दिवस झुंजल्यानंतर परवाच मृत्यू झाला. इतके बळी जाऊनही या प्रकरणात ज्या यंत्रणांनी डोळेझाक केली, त्यातल्या किती यंत्रणांवर कारवाई झाली? या यंत्रणांच्या नेहमीच्या निष्काळजीपणाला लोक आता सरावले आहेत. त्याबद्दल त्यांची तक्रार नाही. पण, जेव्हा अशा भयंकर दुर्घटना घडतात, तेव्हा त्याचं निमित्त करून तरी या यंत्रणांना; गलेलठ्ठ पगार आणि इतर कमाई करणाऱ्या त्यांच्या अधिकाऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करा, एवढीच जनतेची माफक अपेक्षा आहे. मुंबई - पुणे वाहतूक कोंडीसाठी जबाबदार कोण? हेच अजून स्पष्ट होत नाही, यासारखं दुर्दैव नाही. पायाभूत सेवांचा वेगाने विस्तार होतो आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. नवनवे प्रकल्प आखले जात आहेत, त्यांची भूमिपूजनं होत आहेत, त्यासाठी निधीच्या भरीव तरतुदी जाहीर होत आहेत, परदेशी गुंतवणुकीचा वाटाही वाढतो आहे, या सगळ्या कामगिरीबाबत समाधान म्हणूनच राज्यातल्या महायुती सरकारवर महाराष्ट्रातला मतदार पुनःपुन्हा विश्वास व्यक्त करतो आहे, महायुतीला निर्विवाद कौल देतो आहे. विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या या वेगामुळेच बहुसंख्य जनता केंद्रातल्या आणि राज्यातल्या सरकारची समर्थक झाली आहे. धोरणकर्ते देशाला नवनवीन स्वप्नं दाखवून त्याच्या अंमलबजावणीचे साक्षात्कार घडवत असताना या प्रकल्पांच्या दुरुस्ती, देखभालीची जबाबदारी असणाऱ्या यंत्रणा जर गहाळ राहणार असतील, तर त्याचं खापर विनाकारण राजकीय नेतृत्वावरच फुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे, राज्यातल्या सरकारने असे प्रसंग विशेष गांभीर्याने घेऊन असल्या निष्काळजी, गाफीलपणाची जबाबदारी शक्य तितक्या लवकर निश्चित करून संबंधितांवर कारवाई केली पाहिजे आणि ते लोकांच्या निदर्शनासही आलं पाहिजे. मुंबई - पुणे महामार्ग हा देशातील बहुचर्चित द्रुतगती महामार्ग आहे. हा महामार्ग मुंबई आणि पुणे या देशातल्या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडतोच; पण मुंबईचा दक्षिण भारताशी भूपृष्ठावरून संपर्क याच रस्त्याने होतो. रोज सरासरी ५० हजार वाहनं या महामार्गावरून प्रवास करतात. या ५० हजारांत छोट्या चारचाकी गाड्यांपासून मल्टी ॲक्सेल महाकाय मालट्रकचाही समावेश असतो. २५ वर्षांपेक्षा अधिक काळ या महामार्गाची टोल वसुली एकाच कंपनीकडे आहे. ही कंपनी आता देशभर या स्वरूपाची आणखीही काम करते आहे. इतका अनुभव गाठीशी असल्यानंतर या महामार्गावरून कोणकोणत्या प्रकारची वाहतूक होते, त्यात काय जोखीम आहे, आपत्ती व्यवस्थापनाचे कोणते प्रश्न त्यातून निर्माण होऊ शकतात, याची माहिती या कंपनीकडे असायलाच हवी.

## आगामी साप्ताहिकी

९ फेब्रुवारी २०२६ सोमवार
आनंदस्वामी पुण्यतिथी – जालना
व्रजभूषण महाराज पुण्युतिथी – शिवर (दर्यापूर)
भानुदास महाराज जयंती – वायगांव (अमरावती)

१० फेब्रुवारी २०२६ मंगळवार
शुभ दिवस

११ फेब्रुवारी २०२६ बुधवार
श्री रामदास नवमी
पारशी मेहेर मासारंभ
वामन महाराज जन्मोतस्व– सावनेर (अमरावती)

१२ फेब्रुवारी २०२६ गुरुवार
शुभ दिवस

१३ ऑगस्ट २०२० शुक्रवार
विजया एकादशी

१४ फेब्रुवारी २०२६ शनिवार
शनिप्रदोष
रामानंद जालनेकर महाराज जयंती – साखरखेर्डा (बुलढाणा)

१५ फेब्रुवारी २०२६ रविवार
संत सेवालाल महाराज जयंती
महाशिवरात्री शिवपूजन
निशीथकाल उ. रात्रौ ००.२८ पासून १.१८ पर्यंत
शिवगजानन यात्रा – बाळापूर (अकोला)
महाशिवरात्री यात्रा – गोमतेश्वर (बुलढाणा)

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८५५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 9 | | | 6 | | 5 | | 4 |
| | | 1 | | | 4 | 9 | 2 | 6 |
| 5 | | 4 | | | 9 | | | |
| 1 | 5 | 6 | | | 8 | | | |
| | 7 | | | | | | 1 | |
| | | | 1 | | | 6 | 9 | 5 |
| | | | 4 | | | 1 | | 9 |
| 9 | 4 | 8 | 3 | | | 7 | | |
| 6 | | 7 | | 8 | | | 5 | 3 |

### : सूडोकु :


खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. ८५४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 9 | 6 | 4 | 3 | 8 | 2 | 1 | 7 |
| 7 | 3 | 8 | 1 | 2 | 6 | 9 | 4 | 5 |
| 1 | 4 | 2 | 5 | 9 | 7 | 3 | 6 | 8 |
| 8 | 7 | 5 | 2 | 6 | 3 | 1 | 9 | 4 |
| 9 | 6 | 4 | 7 | 5 | 1 | 8 | 2 | 3 |
| 2 | 1 | 3 | 8 | 4 | 9 | 5 | 7 | 6 |
| 6 | 8 | 9 | 3 | 1 | 4 | 7 | 5 | 2 |
| 3 | 2 | 1 | 6 | 7 | 5 | 4 | 8 | 9 |
| 4 | 5 | 7 | 9 | 8 | 2 | 6 | 3 | 1 |

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८५५



**आडवे शब्द**
१. बगीचा
२. जवळचा मित्र
५. नेहमी नेहमी
९. फावला वेळ
१०. आश्रयदाता
११. अंगवळणी पडलेली कृती
१३. वस्तूनिर्मितीचा उद्योग
१५. पिल्लू
१६. छोटा
१८. ताडन करणे
२०. समुद्रमंथनातून निघालेले विष
२२. पायरी
२३. आश्वासन
२४. मैत्रीण
२५. मनाचा ग्रह
२६अ. तुझा
२७. युद्ध, खेळ
२८. बरोबर
३०. हरित रंग
३२. भेद
३४. ध्वनी
३५. अलंकार
३७. वह्या-पुस्तके शाळेत घेऊन जायची पिशवी
३८. स्पष्ट, रोखठोक
४२. टोक
४३. पूर्ण भाग जाणारी संख्या
४४. कुऱ्हाडीचे पाते
४६. आस्था, प्रेम
४८. रगेल
५१. दडून बसणे
५३. वर्ष
५४. बंदुकीची गोळी
५७. आनंद
५८. मिळून सर्व
५९. आवाज
६०. कष्ट, अपेष्टा
६१. वाद
६३. क्रीडांगण
६५. विष्णु
६८. तांदळातले बी
७०. रसाळ
७३. सापाची एक जात
७४. फोडणीचे ताक
७५. जनता
७७. पातकी
७८. भग्नावस्थेतील वाडा इ.
७९. सरिता
८०. नामस्मरण
८१. साखर तयार करताना निघणारा मळ
८२. अर्धा 'र' दाखवणो चिन्ह

**उभे शब्द**
१. लहानसा
२. पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा करणारी नदी
३. कुरकूर
४. बेरीज करणे
५. वारा, संगीतकार डॉ. कुलकर्णी यांचे नाव
६. नमस्कार
७. गुलाम
८. खर्च
९. मित्र
१२. वस्ती
१४. जीभ
१५. सरस्वती
१७. आंब्याची लोकप्रिय जात
१८. पत्राची सुरुवात
१९. माता
२०. उपस्थित
२१. चटकन
२२. उंच मानेचा प्राणी
२३. डावा
२४. विनासायास
२६. तीस दिवस
२७. नवस
२८. प्रश्न
२९. मोठा भाऊ
३१. विवादस्पद
३३. दाक्षिणात्य आमटी
३६. स्वत: भोवती गोल फिरणे
३९. रणमाड्यावरचे शस्त्र
४०. भय
४१. एक उग्र वासाची पालेभाजी
४२. हिंदीत शांती
४३. शासन
४५. चारित्र्य
४६. सहा पैशाचे जुने चलन
४७. भांडणातील मध्यस्थ
४९. वाद्य वाजवणारा
५०. पूल, साकव
५२. बक्षिसाचे चिन्ह
५३. सतत
५५. फुलणे, बहरणे
५६. चंदन यावर उगाळतात
५७. नाजूक, लुभावणारे
६२. लपंडाव
६४. पुरुष
६६. मृत्यू
६७. मनातील किंतु
६९. वाघाचे ओरडणे
७१. शासन
७२. सुट्टीचा दिवस
७३. चिंतन
७४. गुरांचा समूह
७६. सूर्य
७७. पातक

उत्तर उद्याच्या अंकात

**जम्बो शब्दकोडे क्र. ८५४ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.तूपभात ३.तडजोड ५.जमीनजुमला ८.वळवळ ९.अंग १०.गडी ११.ठेव १२.तट १३.माग १४.गैर १५.पलाश १६.पोळा १७.परमेश्वर १८.सवड २०.पहाट २१.रद २२.तहान २५.नुकसान २७.जप २९.नट ३१.वजनदार ३३.तात ३४.रडका ३६.सोस ३८.परी ३९.महान ४०.कयास ४२.मुलाखत ४४.कस ४५.जय ४५अ.लाळ ४६.मरण ४७.समीर ४९.शुभ ५०.टाप ५१.परतणे ५२.पाठ ५३.चक्र ५४.पाली ५५.चणे ५८.वाचक ६०.कडक ६१.कातावणे ६३.करकर ६४अ.पारडे ६६.वानर ६८.सतत ७०.विमान ७१.वसन ७२.बरा ७३.नरकवास ७४.टन

उभे उत्तर : १.तूट २.भाववश २अ.तळ ३.तळतळाट ४.जोडी ५.जग ६.नगर ६अ.जुडी ७.लाडकोड ९.अंगमेहनत ११.ठेला १३.वार १४.गैरहजर १५.परात १६.पोहा १७.पदक १८.सर १९.वदन २३.हाव २४.नजरानजर २६.साता समुद्रापलीकडे २८.पडका ३०.टपरी ३२.दाहक ३५.सोम ३७.मेखला ३८.पसरणे ४१.सखा ४३.तळपणे ४४.कमतरता ४७.सपाता ४८.मीठ ४९.शुक्रवार ५०.टापा ५५.चकवा ५६.पुणे ५७.वीर ५९.कपात ६१.कार ६२.वयोमान ६३.कपास ६४.कला ६५.रतन ६७.नवस ६८.सरा ६९.पीक ७०.विट

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६२१ – ग्रेगोरी पंधरावा पोपपदी.
- १८२२ – हैतीने डॉमिनिकन प्रजासत्ताकवर हल्ला केला.
- १९०० – डेव्हिस करंडक टेनिस स्पर्धा प्रथम सुरू.
- १९७१ – कॅलिफोर्नियात रिश्टर मापनपद्धतिनुसार ६.४ तीव्रतेचा भूकंप.
- १९७३ – बिजु पटनायक ओरिसाच्या मुख्यमंत्रीपदी.
- १९८६ – हॅलेचा धूमकेतु सूर्याभोवतीच्या प्रदक्षिणेतील सूर्यापासून सगळ्यात जवळच्या बिंदुला पोचला.
- २००१ – यु.एस.एस. ग्रीनव्हिल ही अमेरिकेची पाणबुडी जपानच्या एहिमे-मारु या जहाजाला आदळली. १७ ठार.

### राष्ट्रीय

- १९६४ – भारताचा फलंदाज हनुमंत सिंगने आपल्या पदार्पण सामन्यात इंग्लंडविरुद्ध १०५ धावा बनविल्या.
- २००८ – आसाम सरकारने सुप्रसिद्ध गायक भूपेन हजारिका यांना प्रमतेश बरुआ स्मृती जीवनगौरव पुरस्कार व कॅबिनेट मंत्र्याच्या दर्जाने सन्मानित केले.
- २००८ – चित्रपट अभिनेता संजय दत्त आणि मान्यता हे विवाहबद्ध झाले.

### जन्म

- १४०४ – कॉन्स्टन्टाईन अकरावा, शेवटचा बायझेन्टाईन सम्राट यांचा जन्म.
- १५३३ – शिमाझु योशिहिसा, जपानी सामुराई यांचा जन्म.
- १८३० – अब्दुल अझीझ, ऑट्टोमन सम्राट यांचा जन्म.

### निधन

- ११९९ – मिनामोटो नो योरिमोटो, जपानी शोगन यांचे निधन.
- १६३४ – मुराद चौथा, ऑट्टोमन सम्राट यांचे निधन.
- १९८४ – युरी आन्द्रोपोव्ह, रशियन राष्ट्राध्यक्ष यांचे निधन.

## उपदेशकथा

### पैशाने समाधान नाही

ब्रह्मज्ञानी आज्ञवलक्य सधन गृहस्थाश्रमी होता. त्याला दोन बायका होत्या. एकीचे नाव मैत्रेयी व दुसरीचे नाव कात्यायनी. एके दिवशी याज्ञवलक्याने मैत्रेयीला हाक मारली व तो तिला म्हणाला, 'मैत्रेयी ! मी आता संन्यास घेणार आहे. म्हणून तू आणि कात्यायनी दोघींमध्ये माझ्या संपत्तीची वाटणी करून देतो.' कात्यायनी संसारी वृत्तीची साधी बायको होती. मैत्रेयी अध्यात्मवृत्तीची बायको होती. तिला पतीच्या संपत्तीची वाटणी हवी होती. परंतु या नश्वर संपत्तीची नको होती. तिला खरे समाधान देणाऱ्या ब्रह्मविद्येची संपत्ती पाहिजे होती. ती पवित्र संपत्ती याज्ञवलक्यपाशी आहे हे तिला माहीत होते. तिने पतीला विचारले, 'हे भगवन पृथ्वीच्या मोलाइतके द्रव्य जर मला मिळाले. तर मी मुक्त होईन का?' याज्ञवलक्याने तिला उत्तर दिले, 'मैत्रेयी, तूर म्हणतेच ते खरे आहे. द्रव्याने अमृत मिळत नाही. यावर मैत्रेयी म्हणाली, 'द्रव्याने जर अमृतत्व मिळत नाही तर ते घेऊन मी काय करू? अमृतत्व कसे मिळेल ते मला सांगा.' याज्ञवलक्य प्रसन्न होऊन म्हणाला, 'मैत्रेयी, तू अत्यंत प्रिय भाषण करीत आहेस. ये बैस. ते ज्ञान तुला मी सांगतो.' अखेर आपला आत्मा हाच समाधानाचे व प्रेमाचे मूलस्थान आहे असे सांगून त्या आत्म्यालाच पाहण्याचा प्रयत्न करावा. त्याच्याविषयीच ऐकावे. चिंतन करावे आणि त्याचाच ध्यास लावून घ्यावा. कारण त्याचे ज्ञान झाले की सर्व जगाचे ज्ञान होते.' असे याज्ञवलक्य म्हणाला. पैसा मोठा धोका देतो. व्यवहाराला तो अवश्य लागतो. पण त्याचा आधार वाटतो. त्यामुळे त्याचे प्रेम ईश्वरदर्शनाच्या आड येते.

कथा उपदेश : पैशाचे प्रेम नसणे ही खरी संताची हृदयातील खूण आहे.

## : SMS :

Wife-what R U Doing?
Husband- Makhiya Maar rha hun,
Wife-Kitni Maari,
Huband- 3Boy/2girl,
Wife-Kaise Pata Chala,
Huband-Coz, 3 Daaru ki Botal se Chipki thi aur 2 Phone Pe...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| पुणे | २७.९ | १३.१ |
| पंढरपूर | २९.३ | १८.३ |
| सातारा | २९.३ | १०.२ |
| सांगली | ३० | १७.७ |
| सोलापूर | २९.६ | १९ |
| वर्धा | २९.८ | १६.९ |
| वाशिम | २८.५ | १७.५ |
| यवतमाळ | २९.३ | १८.१ |
| औरंगाबाद | २८ | १५.३ |
| अहमदनगर | २७.६ | १६.५ |
| अकोला | २९.८ | १७.६ |
| अमरावती | २९.२ | १७.६ |
| बीड | ३०.२ | १७.३ |
| भंडारा | २८.७ | १७.३ |
| बुलढाणा | २३.२ | ११.४ |
| चंद्रपूर | ३०.१ | १८.३ |
| चेन्नई | ३१.३ | २१.१ |
| नवी दिल्ली | २४ | १२.५ |
| धुळे | २९.७ | १६.७ |
| गोंदिया | २७.६ | १५.१ |
| जळगाव | ३० | १३.४ |
| कोल्हापूर | २९.२ | १६.३ |
| लातूर | २८.४ | १६.५ |
| मुंबई | ३०.७ | २२.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पश्चिम आप्तजन, मित्रांशी वाद होतील. स्वत:च्या विचाराने काम करा.

**तुळ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण अपेक्षेपेक्षा जास्त फायदा झाल्यामुळे मन प्रसन्न राहील. विरोधकांपासून सावधान रहा.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पश्चिम विनम्रतेने आणि सामंजस्याने कामे केल्यास प्रत्येक कामात यश मिळण्याचा योग आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे.

**मिथुन :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : उत्तर सत्कार्याची आवड निर्माण होईल. फायद्याचे अनेक मार्ग सापडतील. कौटुंबिक सुख मिळेल.

**धनु :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व प्रतिष्ठित लोकांशी भेटी होतील ज्याचा फायदा भविष्यात आपल्याला मिळेल. वादांपासून स्वत:ला दूर ठेवा.

**कर्क :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : उत्तर अचानक लाभ होऊन आपल्याला प्रसिद्धी मिळू शकते. व्यापारामुळे प्रवास होऊ शकतो. घरा संबंधी समस्या दूर होईल.

**मकर :** शुभ रंग : पांढरा,शुभ दिशा:उत्तर शुभ, मंगल आणि धार्मिक कार्यात पैसे खर्च होतील. नोकरी, राज्यपक्षात अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**सिंह :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : दक्षिण चांगली बातमी उत्साह वाढविणार आहे. काम करण्याच्या स्थितीत सुधारणा होईल.

**कुंभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:दक्षिण उद्योग-धंदा साधारण राहील. प्रयत्न अधिक केल्यास कामात जास्तीचे यश मिळू शकते.

**कन्या :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : दक्षिण एखादी आनंदाची बातमी मनाची प्रसन्नता वाढवील. मुलांसंबंधातील कामात प्रगती होईल.


**मीन :** शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: उत्तर सद्भाव ठेवा योग्य फळ मिळेल. व्यापारामध्ये विस्तार होण्याचे योग आहेत.

## पंचांग

पंचांग
९ फेब्रुवारी २०२५
सोमवार
विक्रम संवत्– २०८२
माघ शके संवत्– १९४७
संवत्सर – विश्वावसूनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– माघ
ऋतु– सौर शिशिर
कृष्ण पक्ष
तिथि:अष्टमी (अहोरात्र)
नक्षत्र:विशाखा (अहोरात्र)
योग:वृद्धि २४:५१:१८+
करण:बालव १८:१२:५२
करण:कौलव (अहोरात्र)
सूर्य:मकर
चन्द्र:तुला
हिजरी सन् – १४४६
मुस्लिम मास – शाबान
तारीख – २०
विशेष
आनंदस्वामी पुण्यतिथी – जालना
व्रजभूषण महाराज पुण्युतिथी – शिवर (दर्यापूर)
भानुदास महाराज जयंती – वायगांव (अमरावती)

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जिल्हा परिषद निवडणुकीत बोगस मतदान करणाऱ्या सहा जणांविरुद्ध गुन्हा

पुणे (दैनिक संध्या) : जिल्हा परिषद निवडणुकीत बोगस मतदान करणाऱ्या सहा जणांना पकडले. त्यांच्याकडून बनावट आधारकार्ड जप्त करण्यात आले. नगर रस्त्यावरील केसनंद भागात असलेल्या एका मतदान केंद्रावर ही घटना घडली. या प्रकरणी एका महिलेसह सहा जणां विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेले आरोपी बांधकाम मजूर आहेत. ते सध्या केसनंद भागातील नियोजित गृहप्रकल्पाच्या आवारात राहायला आहेत. याबाबत पोलीस हवालदार बाळासाहेब हराळ यांनी वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषदेचे मतदान शनिवारी (७ फेब्रुवारी) पार पडले. केसनंद भागातील श्री जोगेश्वरी विद्यालयाच्या आवारातील मतदान केंद्रात तीन आरोपींनी मतदान केले. तीन जणांची मतदान केंद्रातील कर्मचाऱ्यांनी चौकशी केली. तेव्हा त्यांच्याकडे बनावट आधारकार्ड आढळून आले. पोलिसांनी सहा जणांना ताब्यात घेतले. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेले तीन आरोपी मूळचे उत्तर प्रदेशातील आहेत. उर्वरित तीन आरोपी वाशीम जिल्ह्यातील आहेत. गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर तपास करत आहेत.

### संत गाडगेबाबा यांच्या 150व्या जयंतीनिमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : थोर समाजसुधारक, कीर्तनकार आणि लोकसंत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंती निमित्ताने सदाशिव पेठ येथील भरत नाट्य मंदिर येथे सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संत गाडगेबाबांच्या विचारांचा जागर केला जाणार असून, यात भजन, कीर्तन आणि भारुडाचा बहारदार कार्यक्रम सादर केला जाईल. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रसिद्ध निवेदिका अनघा मोडक यांचे निरूपण लाभणार असून, गायिका केतकी भावे-जोशी आणि ओमकार प्रभूघाटे यांच्या गायनाने हा सोहळा रंगणार आहे.या सर्वांना यशस्वी वाद्यवृंद साथसंगत करणार आहेत. तसेच, हमीद सय्यद यांचे प्रबोधनात्मक भारूड,शाहिर बाळासाहेब मालुसकर यांची शाहिरी आणि कीर्तनकार संदीप पाल महाराज यांचे कीर्तन श्रोत्यांसाठी पर्वणी ठरेल. हा संपूर्ण कार्यक्रम सर्व नागरिकांसाठी प्रवेश विनामूल्य असून, जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहून या सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

### फरार गुंड अटकेत

पुणे (दैनिक संध्या) : वैमनस्यातून एकावर कोयत्याने वार करुन पसार झालेल्या सराइताला सहकारनगर पोलिसांनी अटक केली. खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर गेले तीन महिने तो पोलिसांना गुंगारा देत होता. विशाल बाळासाहेब कांबळे (वय २७, रा. धनकवडी) असे अटक करण्यात आलेल्या सरइताचे नाव आहे. धनकवडीत २५ ऑक्टोबर रोजी वैमनस्यातून एका तरुणावर कांबळेने कोयत्याने वार केले होते. या घटनेत तरुण जखमी झाला होता. या प्रकरणी कांबळे याच्याविरुद्ध सहकारनगर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर तो पसार झाला होता. तो लोहगाव परिसरात येणार असल्याची माहिती पोलीस हवालदार अमोल पवार आणिअभिमान बागलाने यांना मिळाली. पोलिसंच्या पथकाने सापळा लावून त्याला ताब्यात घेतले. सहकारनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल पवार, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मनोजकुमार लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक रुपेश जाधव, उपनिरीक्षक गणेश कर्चे, सद्दामहुसेन फकीर, बापू खुटवड, हवालदार अमोल पवार, निलेश शिवतरे, अभिमान बागलाने, महेश भगत, किरण कांबळे, सागर सुतकर यांनी ही कारवाई केली.




### पुणे रेल्वे स्थानकाच्या फलाटांचे विस्तारीकरण वेगात सुरु होणार

पुणे (दैनिक संध्या) : रेल्वेंतर्गत लोहमार्गावरील स्थानकांची पुनर्बांधणी करून या स्थानकांवरून दक्षिणोत्तर धावणाऱ्या गाड्यांचे स्थलांतर होत नाही, तोपर्यंत पुणे रेल्वे स्थानकावरील ताण कमी होणार नाही, असे मत मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक प्रतीक गोस्वामी यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. तसेच याबाबत युद्धपातळीवर काम सुरू असून गाड्यांचे नियोजन करण्यात येत आहे. त्यानंतरच पुणे रेल्वे स्थानकाच्या फलाटांचे विस्तारीकरण वेगात सुरू होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पुणे विभागांतर्गत दौंड-लोणावळा लोहमार्गावर ‘क्रू लॉब’, इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग, अद्ययावत सुविधांयुक्त इमारत, प्रशिक्षण केंद्र, सोलर पॅनल, इलेक्ट्रिक लोको शेड, लेथ मशिन, ट्रॅक्शन सब स्टेशन आणि तपासणी वाहन सुविधांची अंमलबावणी नव्याने करण्यात आली आहे. याबाबत गोस्वामी यांनी प्रत्यक्षात जाऊन पाहणी करून आढावा घेतला. केडगाव, दौंड, चिंचवड, संगम पूल या ठिकाणी सुरू असलेल्या विकासकामांची प्रत्यक्षात पाहणी केली. त्यानंतर विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत गोस्वामी बोलत होते. पुणे विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेशकुमार वर्मा, मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला आणि इतर विभागीय अधिकारी यावेळी उपस्थित होते. गोस्वामी म्हणाले, ‘पुणे रेल्वे स्थानकातील गाड्यांची संख्या पाहता खूप मोठा भार पडतो आहे. त्या दृष्टीने या स्थानकातील सहा फलाटांचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे. या ठिकाणी पायाभूत सुविधा अत्याधुनिक स्वरुपाच्या असतील. तत्पूर्वी हडपसर, खडकी आणि इतर स्थानकांच्या विस्तारीकरणाचे काम पूर्ण होताच या ठिकाणांवरून नव्याने गाड्या सोडण्याची आमची प्राथमिकता आहे. जेणेकरून पुणे रेल्वे स्थानकावरील भार कमी होईल. गर्दीचे नियोजन, गाड्यांच्या वेळापत्रकात सुधार आणि व्यवस्थापन सहज करता येईल. स्थानकाची क्षमता लक्षणीय वाढेल.’

# महाशिवरात्रीसाठी भीमाशंकर मंदिर राहणार बंद

पुणे (दै. संध्या) :

- भव्य सभामंडप उभारणीचे काम व परिसर विकास कामे वेगात सुरू
- भाविकांनी प्रशासनास सहकार्य करावे- जिल्हाधिकारी



सन 2027 मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रयागराज येथे आयोजित महाकुंभ 2025 मधील अनुभवाच्या आधारे नाशिक कुंभमेळा कालावधीत नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांपैकी मोठ्या संख्येने भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भेट देण्याची शक्यता आहे. साधारणत दररोज सुमारे एक लाख भाविक येथे येण्याची शक्यता लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी श्री क्षेत्र भिमांशकर विकास आराखडा (कुंभमेळा 2027 –गर्दी व्यवस्थापन व इतर सोयी सुविधा) या विशेष विकास आराखड्यास मंजुरी दिलेली आहे. या विकास आराखड्याअंतर्गत भाविकांसाठी सुरक्षित, सुयोग्य व सुसज्ज सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध पायाभूत कामे हाती घेण्यात आलेली असून त्यामध्ये नवीन भव्य सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था, पायरी मार्ग तसेच गर्दी व्यवस्थापनासाठी आवश्यक सुविधा विकसित करण्याची कामे सध्या प्रगतिपथावर असून कुंभमेळ्यापूर्वी सर्व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.कुंभमेळ्याच्या वेळेस श्री.क्षेत्र भिमाशंकर येथे होणाऱ्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता जूना सभामंडपाचे क्षेत्र कमी पडणार असल्यामुळे नवीन भव्य सभामंडपाचे काम हाती घेण्यात आलेले असून त्याबरोबरच पायरी मार्गाचे काम देखील सुरू करण्यात आलेले आहे. मुख्य सभामंडप पुर्णत: उतरविण्यात आल्यामुळे नवीन सभामंडप तयार करताना श्री भिमाशंकर येथे रोज होणारी गर्दी लक्षात घेता मंदीर दर्शनासाठी बंद केल्याशिवाय सदरील काम करणे शक्य होणार नव्हते. तसेच सदर कामांच्या अंमलबजावणीदरम्यान बांधकाम साहित्य, मोठ्या आकाराचे दगड व अन्य यंत्रसामग्री मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर ठेवण्यात आलेली आहे.

कामांचे स्वरूप, परिसरातील भौगोलिक परिस्थिती व भाविकांच्या मोठ्या संख्येचा विचार करता, बांधकाम सुरू असताना मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे हे सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक ठरू शकते. त्यामुळे भाविकांची सुरक्षितता अबाधित राखणे तसेच विकास आराखड्यातील कामे नियोजित कालमर्यादेत पूर्ण करणे या उद्देशाने यापूर्वी मंदिर तीन महिन्यांसाठी (महाशिवरात्रीचा कालावधी वगळून) तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. पूर्वी भाविकांच्या सोयीचा विचार करून महाशिवरात्री कालावधी (दि. 12 फेब्रुवारी 2026 ते दि. 18 फेब्रुवारी 2026) वगळण्यात आला होता. तथापि, सध्या सुरू असलेल्या बांधकामाच्या कामाचा वेग, व्याप्ती व सुरक्षेच्या बाबींचा सखोल आढावा घेतल्यानंतर, मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात दगडी बांधकाम सुरू असल्याने तसेच दगड व बांधकाम साहित्य हलविणे शक्य नसल्यामुळे, महाशिवरात्री कालावधीत मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे सुरक्षिततेच्या दृष्टीने शक्य नसल्याचे निदर्शनास आले आहे.

श्री क्षेत्र भीमाशंकर हा अतिवृष्टीचा प्रदेश असून जून ते सप्टेंबर या कालावधीत येथे अत्यंत जास्त पावसाचे प्रमाण असते. या कालावधीत बांधकाम कामे करणे शक्य नसल्याने उपलब्ध कालावधीतच कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. यामुळे विकास कामांना गती देणे अत्यंत गरजेचे आहे. वरील सर्व बाबींचा विचार करून पूर्वी महाशिवरात्री कालावधीत मंदिर खुले ठेवण्याच्या निर्णयामध्ये बदल करण्यात आलेला असून, दि. 12 फेब्रुवारी 2026 ते दि. 18 फेब्रुवारी 2026 या महाशिवरात्री कालावधीतही श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर भाविकांच्या नित्यदर्शनासाठी बंद राहणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे श्री. जितेंद्र डूडी यांनी स्पष्ट केले आहे.

भाविकांनी तसेच स्थानिक नागरिकांनी सदर निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासन यांना सहकार्य करावे, असे आवाहन जितेंद्र डूडी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी केले आहे.

## ट्रॅव्हल्स मधून ‘अफू’ची वाहतूक; चालक अटक

पुणे (दै. संध्या) :

लक्झरी बसमधून अफू व शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची वाहतूक करणाऱ्या एकास पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून एकूण २८ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई ४ फेब्रुवारी रोजी रावेत परिसरात करण्यात आली. या प्रकरणातील आरोपी श्रवणलाल बहादुरराम देवासी (वय ३६, मुळ रा. पाली, राजस्थान; सध्या रा. पुणे) याला अटक करण्यात आली आहे. तो बस चालक आहे. त्याच्यासह दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस शिपाई सदानंद रुद्राक्षे यांनी रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रावेत येथे एका ट्रॅव्हल्स मधून गुटखा वाहतूक केला जात असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा लावून ट्रॅव्हल्सची पाहणी केली. त्यामध्ये ४४९.५७ ग्रॅम अफू आणि प्रतिबंधित गुटखा आढळून आला. पोलिसांनी तब्बल २८ लाख पाच हजार ६८५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ट्रॅव्हल्स चालक श्रवणलाल याच्याकडे चौकशी केली असता त्याने गुन्हा दाखल झालेल्या सहकाऱ्याने अफू दिल्याचे सांगितले.

## नुपूर महोत्सव-२०२६ चा पुणे येथे शुभारंभ

पुणे (दै. संध्या) :

- कथ्थक,भरतनाट्यम, कुचीपुडी आणि ओडिसी नृत्य परंपरेचा अनोखा आविष्कार
- सुरेल, लयबद्ध आणि तालबद्ध नृत्यास रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

सांस्कृतिक कार्य विभागाच्या सांस्कृतिक संचालनालयाच्यावतीने आयोजित नुपूर महोत्सवाचे मुख्य सचिव कार्यालयाचे अवर सचिव विठ्ठल भास्कर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन शुभारंभ करण्यात आला.

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक स्मारक मंदिर येथे आयोजित महोत्सवास महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीचे अध्यक्ष आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे, सांस्कृतिक संचालनालयाच्या पुणे कार्यालयाच्या अधीक्षक जान्हवी जानकर, कार्यक्रम समन्वयक गौरी लोंढे, कला रसिक आदी उपस्थित होते.

या महोत्सवात कथ्थक,भरतनाट्यम, कुचीपुडी आणि ओडिसी नृत्य परंपरेचा अनोखा आविष्कार रसिकांना अनुभवता येणार आहे. या महोत्सवामध्ये दिल्ली, कोलकाता, जबलपूर, पुणे, मुंबई आणि नाशिक येथील दिग्गज कलाकार सहभागी झाले आहेत. पहिल्या दिवशीच कृत्य नरसिंग राणा यांनी सितास्वयंवर (ओडिसी), सलोनी देशपांडे ग्रुपच्यावतीने दशावतार, वेदांती भागवत ग्रुपच्यावतीने चतुरंग, राजलक्ष्मी भास्करने कृष्णरंग, राजश्री धोंगडे ग्रुपच्या नृत्यधारा, अथर्व चौधरी भरतनाट्यम, माया कुलश्रेष्ठ ग्रुपच्यावतीने मीरा (बॅले) सादर करण्यात आलेल्या सुरेल, लयबद्ध, तालबद्ध नृत्यास रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

रविवार, ८ फेब्रुवारी २०२६ रोजी डॉ. सुमुखी अथणी ग्रुप, शालिनी खरे ग्रुप, वेदांती भागवत ग्रुप, राजश्री धोंगडे ग्रुप, गौरेश शेटकर ग्रुप, रसिका गुमास्ते, सुभिता मुरली ग्रुपच्यावतीने नृत्य सादर करण्यात येणार आहे. रसिकांसाठी हा कार्यक्रम विनामूल्य असून या कार्यक्रमास अधिकाधिक संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.




## वेधशाळा चौकात मोटारीला आग, अग्निशमन दलाकडून आग आटोक्यात



पुणे (दै. संध्या) :

वेधशाळा चौकात मोटारीला आग लागल्याची घटना शनिवारी रात्री घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. मोटार चालक बाहेर पडल्याने गंभीर दुर्घटना टळली. वेधशाळा चौकातून मोटार चालक नितीन झगडे (रा. बारामती) हे वेधशाळा चौकातून शनिवारी रात्री निघाले होते. त्या वेळी मोटारीच्या दर्शनी भागातून मोठ्या प्रमाणावर धूर येऊ लागला. एका वाहन चालकाने झगडे यांना सांगितले. झगडे यांनी मोटार रस्त्याच्या कडेला थांबविली. सुरुवातीला नागरिकांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, आग भडकली. या घटनेची माहिती अग्निशमन दलाला कळविण्यात आली. अग्निशमन दलाच्या कसबा पेठ केंद्रातील अधिकारी कमलेश चौधरी, संजय गायकवाड, उबेद शेख, सुमित दळवी, प्रसाद नाणेकर, आतिश नाईकनवरे, मयूर चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेतली. पाण्याचा मारा करुन आगीवर नियंत्रण मिळवले. मोटारीत आग नेमकी कशी लागली, याची माहिती मिळू शकली नाही. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता अग्निशमन दलाने व्यक्त केली. उन्हाळ्यात वाहने पेटण्याच्या घटना घडतात. मोटार, तसेच चारचाकी वाहनांमधील इंजिन गरम होणे, तसेच अंतर्गत भागात शॉर्ट सर्किट होऊन आग लागण्याच्या घटना घडतात.

## आईवरून शिवीगाळ केल्याच्या रागातून तरुणाचा खून

पुणे (दै. संध्या) :



आईवरून शिवीगाळ केल्याच्या रागातून एका तरुणाने अनोळखी व्यक्तीचा दगडाने ठेचून खून केला. ही घटना सोमाटणे फाटा येथे गुरुवारी (५ फेब्रुवारी) सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास घडली. खून झालेल्या तरुणाची ओळख पटली नाही. याप्रकरणी आकाश बालाजी शिंदे (वय २७, नोकरी, रा. तळेगाव दाभाडे) यांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी सनी प्रमोद चव्हाण (२४, शिरगाव-गहुंजे, ता. मावळ, जि. पुणे) याला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका अनोळखी तरुणाने आरोपी सनी चव्हाण याच्या आईवरून शिवीगाळ केली. त्याचा राग आल्याने आरोपीने दगडाने ठेचून अनोळखी तरुणाचा खून केला. घटनास्थळी दारूचे साहित्य आढळल्याने हा प्रकार दारू पिताना झालेला असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तळेगाव दाभाडे पोलीस तपास करीत आहे.

# पुण्याच्या महापौर, उपमहापौरांचा वेगळाच रुबाब!

## दिमतीला कोट्यवधींच्या आलिशान गाड्या

पुणे (दै. संध्या) :

महापालिकेतील प्रशासकराज संपुष्टात येऊन सुमारे चार वर्षांनी महापालिकेचे सभागृह पुन्हा एकदा लोकप्रतिनिधींनी गजबजणार आहे. उद्या (सोमवारी) ९ फेब्रुवारीला महापौर, उपमहापौर पदासाठी निवडणूक घेतली जाणार आहे. यासाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलवण्यात आली असून महापालिकेचे सभागृह अस्तित्वात येणार आहे. महापालिकेत महापौर उपमहापौर यांच्या निवडीनंतर पुढील काही दिवसातच स्थायी समिती अध्यक्ष, विरोधी पक्षनेते, सभागृह नेते तसेच विविध समित्यांच्या सदस्यांची निवड केली जाणार आहे. या समित्यांच्या सदस्यांमधून अध्यक्षांची निवड होणार आहे. महापालिकेच्या सभागृहात नवीन पदाधिकारी येणार असल्याने त्यांच्या स्वागताची जोरदार तयारी महापालिका प्रशासनाने सुरू केली आहे.

चार वर्षानंतर पुणे शहराला महापौर, उपमहापौर आणि इतर पदाधिकारी मिळणार आहेत. त्यांच्यासाठी अद्यावत वाहने खरेदी करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला असून यासाठी सव्वा पाच कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. शहराच्या प्रथम नागरिक असलेल्या महापौरांसाठी ‘हायक्रॉस’, विरोधी पक्ष नेता व शहर सुधारणा समिती अध्यक्षांना फिरण्यासाठी ‘व्हिक्टोरिअस’ या गाड्या दिल्या जाणार आहेत. या गाड्या अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त आणि आलिशान असून त्यामधून ये जा करतांना पुणेकरांचे लक्ष आकर्षित करून घेणार आहेत.

महापालिकेतील प्रमुख पदाधिकाऱ्यांसह विधी, शिक्षण तसेच इतर समिती अध्यक्षांनाही तितक्याच महागड्या गाड्या मिळणार आहेत. महापालिकेकडून अशा २८ गाड्यांची खरेदी केली जाणार असून यासाठी सुमारे सव्वा पाच कोटी रुपये खर्च होणार आहे. याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समितीकडे पाठविण्यात आला असून त्याला मंजुरी दिल्यानंतर ही खरेदी केली जाणार आहे. पुढील पंधरा दिवसांमध्ये या सर्व गाड्या महापालिकेच्या ताब्यात दाखल होणारा असून संबंधित पदाधिकाऱ्यांना दिल्या जाणार आहेत. महापालिकेत यापूर्वी २०१७ मध्ये निवडणूक झाली होती. त्यानंतर २०२२ मध्ये निवडणूक होणार होती. मात्र राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेतल्याने महापालिकेच्या सभागृहाची मुदत संपुष्टात आली. त्यानंतर महापालिकेत राज्य सरकारच्या वतीने प्रशासक नेमण्यात आला. महापालिका आयुक्तांकडेच प्रशासकाची जबाबदारी देण्यात आली. त्यांच्या माध्यमातून गेल्या चार वर्षापासून महापालिकेचा कारभार चालविला जात आहे.

नऊ वर्षापूर्वी २०१७ मध्ये जे पदाधिकारी वाहने वापरत होते. ती सर्व वाहने आता जुनी झाली आहेत. ही वाहने आता वापरता येणार नसल्याने पदाधिकाऱ्यांसाठी ही नवीन वाहने खरेदी केली जात आहेत. त्यासाठी महापालिकेच्या २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे नवीन वाहनांसाठीचा ५ कोटी ३० लाख रुपयांचा खर्च महापालिका विकासकामांच्या निधीला काही प्रमाणात कात्री लावून भागविणार का ? अशी विचारणा केली जात आहे.

महापालिका प्रशासनाच्या वतीने महापौर उपमहापौरांसह इतर पदाधिकाऱ्यांसाठी करण्यात येणाऱ्या वाहन खरेदीबाबत स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी प्रश्न उपस्थित केला आहे. सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर म्हणाले, पदाधिकाऱ्यांसाठी यापूर्वी खरेदी करण्यात आलेल्या जुन्या गाड्यांचे काय झाले हे प्रशासनाने स्पष्ट करावे. प्रशासनातील अधिकाऱ्यांसाठी महापालिकेने इलेक्ट्रिक गाड्यांची खरेदी केली आहे तशाच गाड्या पदाधिकाऱ्यांना देण्यात याव्यात त्यामुळे प्रदूषणही कमी होईल.




### अशा आहेत गाड्या...

शहराचे प्रथम नागरिक म्हणून काम पाहणारे महापौर यांना ‘एसयूव्ही’ प्रकारातील वाहन दिले जाणार आहे. यासाठी ‘इनोव्हा हायक्रॉस’ या आलिशान वाहनाची निवड करण्यात आली आहे. त्यासाठी महापालिकेकडून २५ लाख ४१ हजार १५७ रुपये इतके रुपये खर्च केले जाणार आहेत. तर विरोधी पक्ष नेता, शहर सुधारणा समिती अध्यक्ष यांच्यासाठी मध्यम आकारातील ‘एसयूव्ही’ प्रकारामधील ‘मारुती व्हिक्टोरिअस’ ही कार खरेदी केली जाणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### त्यागमुर्ती रमाई भिमराव आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

बारामती (दैनिक संध्या) : त्याग,सहनशीलता व कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक असलेल्या त्यागमुर्ती महामाता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शनिवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सामुदायिक बुद्ध पूजापाठ व अभिवादन कार्यक्रम चंद्रमणी नगर बौद्ध विहार,आमराई,बारामती येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात बुद्धपूजापाठाने करण्यात आली.यावेळी महामानव तथागत भगवान गौतम बुद्ध,भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महामाता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.माता रमाई यांच्या त्यागमय जीवनकार्यावर उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीत रमाई यांनी दिलेले योगदान,त्यांचा संघर्ष,सहनशीलता व कुटुंबासाठी केलेला त्याग याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमास बुद्ध उपासक,उपासिका तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम शांततामय व प्रसन्न वातावरणात पार पडला.चंद्रमणी नगर बुद्ध विहार महिलासमितीच्या वतीने उपस्थित सर्वांचे आभार मानण्यात आले.

### शेततळ्यात बुडून मृत्युमुखी पडलेल्या लहानग्यांच्या कुटुंबाला मदतीचा हात

■ इनामदार कुटुंबाला शिवसेनेकडून पाच लाखांची मदत

■ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडीओ कॉल करून केले मृत मुलांच्या कुटुबियांचे सांत्वन

जुन्नर (दैनिक संध्या) : शेततळ्यात बुडून मृत्युमुखी पडलेल्या आफान अफसर ईनामदार ( वय १०) आणि रीफत अफसर ईनामदार ( वय ७) या चिमुकल्यांच्या कुटुंबियांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाच लाख रुपयांची मदत देऊ केली आहे. नगरपालिका निवडणुकीवेळी जुन्नरमध्ये पचारासाठी आले असता त्यांना या दुर्दैवी घटनेबद्दल कळल्यानंतर त्यांनी ईनामदार कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली होती. त्यानंतर आता त्यांनी त्यांना मदतीचा हात देऊ केला आहे. जुन्नरमध्ये २२ नोव्हेंबर रोजी घडलेल्या दुर्वेवी घटनेत अफसर इनामदार यांची दोन्ही मुले खेळत असताना शेततळ्यात पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने पूर्ण जुन्नर तालुका हळहळला, त्याच वेळी १ डिसेंबर रोजी नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी जुन्नर येथे गेले असता स्थानिक शिवसेना नगरसेवक मयुर महाबरे यांनी ही घटना आमदार शरद सोनवणे यांना सांगितली. त्यांनी तत्काळ उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या कानावर ही बाब घातली. यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी प्रचारातून वेळात वेळ काढून ईनामदार कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेऊन त्यांना मदतीचे आश्वासन दिले. त्यानुसार काल ६ फेब्रुवारी रोजी शिवसेनेच्या वतीने आमदार शरद सोनवणे, शिवसेना सचिव राम रेपाळे आणि युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, स्थानिक नगरसेवक मयुर महाबरे आणि स्थानिक शिवसैनिकांनी ईनामदार कुटुंबाची भेट घेऊन पाच लाखांची ही मदत त्यांना सुपुर्द केली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः व्हिडीओ कॉलद्वारे संवाद साधून इनामदार कुटुंबीयांचे सांत्वन केले. झालेली घटना दुर्दैवी असून स्वतःची मुले गमावण्याचे दुःख काय असते ते मला चांगले माहिती आहे.

### व्हिबीजी रामजी योजनेतील 70 हजार कामे ठप्प

यवतमाळ (दैनिक संध्या) : आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी केंद्र सरकारच्या ‘व्हिबीजी रामजी’ अर्थात पूर्वीच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील (मनरेगा) कंत्राटी कर्मचारी व अधिकाऱ्यांनी पुकारलेल्या राज्यव्यापी कामबंद आंदोलनामुळे यवतमाळ जिल्ह्यासह राज्यातील विकासकामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. मुंबईतील आझाद मैदानावर गेल्या सहा दिवसांपासून हे कर्मचारी ठिय्या देऊन असून, आता त्यांनी ‘अन्नत्याग’ आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या आंदोलनामुळे यवतमाळ जिल्ह्यातील ७० हजारांवर कामे गेल्या १५ दिवसांपासून रखडली आहेत. इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणेच ‘व्हिबीजी रामजी’ कर्मचाऱ्यांनाही शासकीय सेवेत सामावून घ्यावे, बाह्य यंत्रणेमार्फत होणारी भरती प्रक्रिया तात्काळ थांबवावी, राज्य निधी असोसिएशनमार्फत नियुक्ती देऊन ‘समान काम, समान वेतन’ धोरण लागू करावे, इतर विभागांप्रमाणे मनरेगाची स्वतंत्र यंत्रणा तयार करून पदनिहाय आकृतीबंध निश्चित करावा अशा विविध मागण्या या कर्मचाऱ्यांनी केल्या आहेत. हे आंदोलन टप्प्याटप्प्याने तीव्र करण्यात आले आहे. २३ ते २६ जानेवारी दरम्यान काळ्या फिती लावून निषेध नोंदवण्यात आला. त्यानंतर २७ जानेवारीपासून पूर्णतः कामबंद आंदोलन सुरू झाले. २ फेब्रुवारीपासून मुंबईत ठिय्या आंदोलन सुरू असून, ६ फेब्रुवारीपासून कर्मचाऱ्यांनी अन्नत्याग सुरू केले आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत मागे हटणार नाही, असा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. कर्मचाऱ्यांच्या कामबंद आंदोलनामुळे ग्रामीण विकासाचा पाया असलेल्या या योजनेला खीळ बसली आहे. सरकार कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

### महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना

यवतमाळ (दैनिक संध्या) : तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापूर गावात महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे महाराष्ट्रातून संताप व्यक्त केला जात आहे. आता राज्याचे अन्न व पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या घटनेतील आरोपींवर कठोरातील कठोर शिक्षा द्यावी, तसंच, महात्मा जोतिबा फुले यांची नवा पुतळा स्थापन करवा अशी मागणी छगन भुजबळ यांनी या पत्राद्वारे अमित शहांकडे केली आहे. तेलंगणा राज्यातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापूर गावात सामाजिक, शैक्षणिक क्रांतीचे अग्रदूत, राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची ७ फेब्रुवारी रोजी दिवसाढवळ्या हल्ला करण्यात आला. हा हल्ला अत्यंत निंदनीय, गंभीर गुन्हा आहे. या घटनेमुळे कोट्यवधी समर्थकांच्या भावना दुखावल्या असून सामाजिक समता, शिक्षण आणि मानवतावादी विचारधारेवर आघात आहे, असं छगन भुजबळ म्हणाले. “महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८४८ साली देशातील पहिले महिला विद्यालय स्थापित करून स्त्री शिक्षणाचा मार्ग मोकळा करून दिला. त्यांनी सावित्रीबाई फुले यांना देशातील पहिली महिला शिक्षिका म्हणून घडवलं. त्यांनी सती प्रथा, बालविवाह आणि विधवांवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात आवाज उठवला. तसंच अस्पृश्यता, जाति प्रथांसारख्या सामाजिक गुन्हे ठरवून शूद्र, महिला, शेतकरी, कामगार आणि वंचित वर्गांना संगठित करून सामाजिक क्रांतीचा मार्ग मोकळा करून दिला. सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी समतामूलक समाजाचा पाया मजबूत केला”, असंही भुजबळांनी सांगितलं.

# महावितरणची प्रतिज्ञा, जनमित्रांची सुरक्षा



■ किशोर खोबरे ■
जनसंपर्क अधिकारी, महावितरण

नवी दिल्ली (दै. संध्या) :

ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीज पुरवठा उपलब्ध होण्यासाठी विद्युत वितरण व्यवस्थेच्या देखभाल - दुरुस्तीत महावितरणच्या लाईनस्टाफची/ जनमित्रांची भूमिका अत्यंत मोलाची आहे. पावसाळा, उन्हाळा, वादळ, रात्री-अपरात्री अशा कोणत्याही परिस्थितीत ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी जनमित्र नेहमीच अग्रभागी उभा असतो. त्यामुळे जनमित्रांची सुरक्षितता ही केवळ नियमांची बाब नसून, ती महावितरणची मूलभूत जबाबदारी आहे.

महावितरणने २० व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने विद्युत सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत "प्रकाशित महाराष्ट्र,सुरक्षित महाराष्ट्र" ही जागतिक विक्रमी मोहीम राबविली. या यशस्वी मोहिमेनंतर महावितरणने "सुरक्षा प्रथम" हा मंत्र अधिक प्रभावीपणे बिंबविण्यासाठी, सुरक्षिततेची कार्यसंस्कृती जोपासण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या सुरक्षितता अधिनियम २०२३ अंतर्गत १२ डिसेंबर २०२५ रोजीच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे "शून्य विद्युत अपघात" संकल्पना राबविण्यासाठी महावितरणने परिपत्रक जारी करून सर्व उपविभाग व शाखास्तर क्षेत्रीय कार्यालयात प्रत्येक सोमवारी अर्थात आठवड्याच्या पहिल्या दिवशी कर्मचाऱ्यांनी सामूहिक सुरक्षा प्रतिज्ञा/शपथ घेऊन कामाची सुरुवात करण्याचा निर्णय घेतला आहे. गत काही वर्षात जनमित्रांच्या वीज अपघाताचे प्रमाण कमी झाले आहे, मात्र "शून्य अपघात" हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने जनमित्रांसाठी विद्युत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून काही महत्वाच्या बाबीं या लेखाद्वारे स्पष्ट करण्यात येत आहेत.

जनमित्रांना उच्च दाबाच्या वीजवाहिन्या, उंच खांब, रोहित्रे इ. विद्युत उपकरणांवर काम करावे लागते. अशा कामांमध्ये थोडीशी निष्काळजीपणा किंवा घाईही गंभीर अपघातास कारणीभूत ठरू शकते.आपले प्राण सर्वात मौल्यवान आहेत, कोणतेही काम त्यापेक्षा मोठे नाही, त्यामुळे “सुरक्षा प्रथम” हा मंत्र प्रत्येक कर्मचाऱ्याने आत्मसात करणे आवश्यक आहे. कामे करताना कामाची परवानगी घेणे, व्यक्तिगत सुरक्षा साधनांचा वापर करणे अत्यावश्यक आहे.

विद्युत कामात कार्य पूर्वपरवानगी (पीटीडब्लू) प्रणालीमुळे काम सुरू करण्याआधी विद्युत वाहिनी काम करण्यासाठी पूर्णपणे सुरक्षित आहे याची खात्री होते. शटडाऊन, अर्थिंग आणि योग्य समन्वय न करता काम करणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. पीटीडब्लू म्हणजे केवळ कागदपत्र नाही, तर जीवनरक्षणाची हमी आहे.

व्यक्तिगत सुरक्षा साधने (पीपीई किट) त्यात सेफ्टी हेल्मेट, रबरी हातमोजे, सेफ्टी शूज, सेफ्टी बेल्ट/हार्नेस, गॉगल्स व रिफ्लेक्टर जॅकेट, डिस्चार्ज रॉड यांचा योग्य वापर केल्यास अनेक अपघात टाळता येतात. पीपीई किट शिवाय कोणतेही विद्युत काम नाही, ही भूमिका प्रत्येकाने काटेकोरपणे पाळली पाहिजे.

जनमित्रांच्या सुरक्षेत सांघिक व प्रभावी संवाद महत्त्वाचा आहे. नियंत्रण कक्ष, वरिष्ठ अधिकारी आणि सहकाऱ्यांशी सतत संपर्क ठेवल्यास गैरसमज व धोके टाळता येतात. एकमेकांची काळजी घेणे हीच खरी सुरक्षिततेची संस्कृती आहे.

महावितरणमध्ये सुरक्षितता म्हणजे केवळ नियमांचे पालन नव्हे, तर एक सवय आणि संस्कृती आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने “मी सुरक्षित आहे का?” हा प्रश्न स्वतःला सतत विचारला पाहिजे. कारण सक्षम महावितरणसाठी जनमित्रांची सुरक्षा महत्वाची आहेच. त्यासोबतच प्रत्येक सुरक्षित काम म्हणजे एका कुटुंबाच्या आनंदाची हमी आहे. जनमित्रहो, सुरक्षा प्रथम! सुरक्षित राहा, सुरक्षित कामे करा!

## भारत आणि सेशेल्सचे संबंध मैत्रीपूर्ण आणि धोरणात्मक

मुंबई (दै. संध्या) :

भारत आणि सेशेल्सचे संबंध हे मैत्रीपूर्ण, धोरणात्मक आहेत. दोन्ही देश हे हिंद महासागरातील महत्त्वाचे सागरी देश असून दोन्ही देशातील व्यावसायिक संबध अधिक बळकट करण्यावर आम्ही भर देत आहोत. व्यावसायिक परिषदेच्या माध्यमातून विकासाच्या संधी अधिक वाढतील ज्या दोन्ही राष्ट्रांसाठी महत्वपूर्ण ठरतील, अशी आशा सेशेल्स प्रजासत्ताकचे राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांनी व्यक्त केली. सेशेल्स प्रजासत्ताकचे राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी व सेशेल्स प्रजासत्ताकच्या प्रथम महिला श्रीमती व्हेरॉनिक हर्मिनी यांचे शिष्टमंडळ भारत भेटीवर आहेत. या भेटीदरम्यान भारतीय उद्योग महासंघ आणि परराष्ट्र मंत्रालय यांच्यावतीने हॉटेल ताज येथे भारत आणि सेशेल्स व्यावसायिक परिषद बैठक आयोजित केली होती. यावेळी सेशेल्स या देशाचे अर्थमंत्री (आर्थिक नियोजन, व्यापार व गुंतवणूक) पिअर लापोर्ते, परराष्ट्र व्यवहार मंत्री बॅरी फॉली, भारत सरकारचे केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल, बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्रालयाचे सचिव विजय कुमार, मुंबई बंदर प्राधिकरणचे अध्यक्ष एम.अंगामुथू आणि आणि जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणचे अध्यक्ष गौरव दयाल, भारतीय उद्योग महासंघाचे (CII) प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

## खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत धान खरेदी योजना प्रभावीपणे राबविण्यास राज्य शासन कटिबद्ध – अग्रिम निधी वितरित

मुंबई (दै. संध्या) :

राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाला किमान आधारभूत किंमत (MSP) मिळावी व बाजारभावातील चढ-उतारापासून संरक्षण मिळावे, यासाठी खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत धान खरेदी योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धान्याचा मोबदला वेळेत अदा करता यावा, यासाठी राज्य शासनामार्फत संबंधित खरेदी संस्थांना अग्रिम निधी वितरित करण्यात आला असल्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने कळविले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महासंघ तसेच जिल्हास्तरीय सहकारी संस्था यांच्या माध्यमातून जिल्हानिहाय अधिकृत खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली असून, निर्धारित गुणवत्ता निकषांनुसार भात, मका व ज्वारी खरेदी केली जात आहे. शेतकऱ्यांची नोंदणी, धान्याची गुणवत्ता तपासणी, अधिकृत वजन आणि हमीभावानुसार थेट बँक खात्यात देयक जमा करण्याची पारदर्शक प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

खरेदी प्रक्रिया सुरळीत व गतिमान राहावी तसेच शेतकऱ्यांना देयके वेळेत मिळावीत, यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मार्फत भात खरेदीसाठी रु. १९४.७९ कोटी, मका खरेदीसाठी रु. १४.२४ कोटी व ज्वारी खरेदीसाठी रु. २.८३ कोटी अग्रिम निधी वितरित केला आहे. तर महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महासंघ मार्फत भात खरेदीसाठी रु. १२९.४५ कोटी, मका खरेदीसाठी रु. ४.६० कोटी आणि ज्वारी खरेदीसाठी रु. १६.३६ लाख इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

सदर निधीमुळे खरेदी केंद्रांवरील साठवणूक, वाहतूक, मनुष्यबळ व देयक वितरण व्यवस्था अधिक सक्षम होणार असून, विशेषतः आदिवासी व दुर्गम भागातील शेतकऱ्यांना हमीभावाचा लाभ वेळेत मिळण्यास मदत होणार आहे. राज्य शासन शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून, खरीप हंगाम २०२५-२६ मधील धान खरेदी पारदर्शक, कार्यक्षम व नियोजित कालावधीत पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. नोंदणीकृत शेतकऱ्यांनी अधिकृत खरेदी केंद्रांवर आपला कृषी माल देऊन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मराठी माणसाच्या हक्कांसाठी पुन्हा एकदा एल्गार

**महाराष्ट्र मराठी सामाजिक संघाचा इशारा**

मुंबई (दै. संध्या) :

मुंबई आणि महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये मराठी माणसाच्या नोकरी, व्यवसाय, धंदा, दुकानदार, ठेकेदारी तसेच सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातील वाढत्या आर्थिक पिळवणुकीविरोधात महाराष्ट्र मराठी सामाजिक संघ आक्रमक झाला आहे. परप्रांतीयांचे वाढते वर्चस्व, मराठी युवकांमधील बेरोजगारी आणि शासनाच्या धोरणांमुळे मराठी समाज आर्थिकदृष्ट्या कमकुवत होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

संघटनेचे संस्थापक प्रमुख दीपक काळींगण यांनी जाहीर निवेदनाद्वारे सर्व मराठी समाजबांधवांना सावधानतेचा इशारा देत एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. “मुंबई व महाराष्ट्रात मराठी माणूसच दुय्यम ठरत असून नोकऱ्या, उद्योग, व्यापार आणि ठेकेदारीत मराठी युवकांना संधी नाकारली जात आहे,” असे त्यांनी नमूद केले.



संघटनेनुसार केंद्र व राज्य सरकारच्या विविध खात्यांमध्ये, बँका, रेल्वे, गोदी तसेच खासगी क्षेत्रात मराठी माणसांचे प्रमाण घटत चालले आहे. उच्च शिक्षण घेऊनही मराठी युवक बेरोजगार राहत असून त्यामुळे भविष्यात गुन्हेगारी, लाचारी व मानसिक तणाव वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

मराठी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी संघटनेने काही ठोस मागण्या मांडल्या आहेत. स्थानिक मराठी समाजाला नोकरी, व्यवसाय, व्यापार व ठेकेदारीत किमान ७० टक्के हक्क मिळावेत, शासकीय व निमशासकीय कार्यालयांत मराठी भाषेचा सक्तीने वापर व्हावा, तसेच मुंबई व महाराष्ट्राच्या विकास आराखड्यात स्थानिक मराठी माणसाला प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच “मराठीत घरात, दारी व कार्यालयात बोला”, “हिंदी-इंग्रजीच्या अतिरेकाला विरोध करा”, “मराठी भाषा व अस्मितेचा अभिमान बाळगा” अशा ठोस सामाजिक संदेशांसह मराठी समाजात जनजागृती करण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे.

मराठी समाजाच्या सर्व घटकांन कामगार, व्यापारी, दुकानदार, कलाकार, उद्योजक, विद्यार्थी, बेरोजगार युवक-युवती एकत्र येऊन संघटनेत सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र मराठी सामाजिक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## कोकणातील मुंबईकरांसाठी आज चिपळूण–पनवेल मेमू विशेष

रत्नागिरी (दै. संध्या) :

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदानासाठी गावी आलेल्या कोकणवासीयांच्या परतीच्या प्रवासासाठी कोकण रेल्वेने चिपळूण–पनवेल मार्गावर अनारक्षित मेमू विशेष रेल्वेगाडी सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ही विशेष गाडी रविवारी, ८ फेब्रुवारी रोजी धावणार आहे. ०११५८ क्रमांकाची चिपळूण–पनवेल विशेष मेमू गाडी दुपारी ३.२५ वाजता चिपळूण रेल्वे स्थानकातून सुटेल व रात्री ८.१५ वाजता पनवेल येथे पोहोचेल. या गाडीला आंजणी, खेड, कळंबणी बुद्रुक, दिवाणखवटी, विन्हेरे, करंजाडी, साफेवामणे, वीर, गोरेगाव रोड, माणगाव, इंदापूर, कोलाड, रोहा आणि पेण या स्थानकांवर थांबे असतील. दरम्यान, पनवेलला पोहोचलेली हीच विशेष गाडी ०११५७ क्रमांकाने पनवेल–रत्नागिरी मार्गावर रविवारी रात्री ८.२५ वाजता सुटेल. ही गाडी सोमवारी पहाटे ४ वाजता रत्नागिरी येथे पोहोचणार आहे. या प्रवासात आपटा, पेण, रोहा, कोलाड, इंदापूर, माणगाव, गोरेगाव रोड, वीर, साफेवामणे, करंजाडी, विन्हेरे, दिवाणखवटी, कळंबणी बुद्रुक, खेड, आंजणी, चिपळूण, सावर्डे, आरवली आणि संगमेश्वर या स्थानकांवर गाडी थांबणार आहे. मतदानासाठी गावी आलेल्या चाकरमान्यांच्या सोयीसाठी ही विशेष रेल्वेगाडी सोडण्यात येत असल्याची माहिती कोकण रेल्वे प्रवासी संघटनेचे अक्षय महापदी यांनी दिली.

# सेवा सहयोगतर्फे “सेवाफेस्ट २०२६”चे आयोजन

## स्वयंसेवेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना

पुणे (दै. संध्या) :

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वयंसेवा, सामाजिक सहभाग आणि क्रेडिट-आधारित उपक्रमांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. याच उद्देशाने सेवा सहयोग फाउंडेशनतर्फे “सेवाफेस्ट २०२६” या विशेष उपक्रमाचे आयोजन शनिवारी, १४ फेब्रुवारी रोजी सिंहगड रोड येथील पु. ल. देशपांडे उद्यानशेजारील कलाग्राम येथे सायंकाळी साडेचार ते रात्री आठ या वेळेत करण्यात आले आहे.



राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांना सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी करून स्वयंसेवक तास पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यातील एम.ई.एस वरिष्ठ महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय यांसारख्या नामांकित शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी सेवा सहयोग फाउंडेशनसोबत शिक्षण, पर्यावरण आणि वस्ती विकासाशी संबंधित विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. या संस्थांनी सेवा सहयोगसोबत सामंजस्य करार करून स्वयंसेवेची औपचारिक जबाबदारीही स्वीकारली आहे.

सेवा सहयोगच्या माध्यमातून वस्ती भागातील हजारो गरजू मुलांसाठी स्कूल किट वाटप, विद्यार्थी विकास व शिष्यवृत्ती योजना, सेवा भोजन, किशोरी विकास योजना, स्वच्छता व आरोग्य जनजागृती, व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे, अभ्यासिका तसेच दिव्यांग मुलांसाठी विशेष केंद्रे चालवली जात आहेत. महिला सक्षमीकरणासाठी स्वावलंबन व व्यवसाय मार्गदर्शन, तसेच ‘समुत्कर्ष योजना’ राबवून अनेक महिलांनी बचत गट स्थापन करून स्वतःचे व्यवसाय सुरू केले आहेत. याशिवाय ‘निर्मल वारी’ हा उपक्रम पंढरपूर वारीतील गावांमध्ये यशस्वीपणे राबवला जात असून, राज्य शासनानेही त्याची दखल घेतली आहे. ‘युथ फॉर सेवा’ या उपक्रमातून तरुणांना समाजकार्याशी जोडले जात आहे, तर ‘मॅजिक गुल्लक’ या योजनेद्वारे शालेय विद्यार्थ्यांमध्ये बचतीची सवय विकसित केली जात आहे. कोविड-१९ काळातही सेवा सहयोगने गरजू कुटुंबांना मदत करून उल्लेखनीय कार्य केले होते.

संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेल्या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक वर्ष २०२६ निमित्त आयोजित ‘सेवाफेस्ट २०२६’मधून शैक्षणिक संस्था, विद्यार्थी, स्वयंसेवी संघटना आणि नागरिकांना एकत्र आणून स्वयंसेवेची संस्कृती अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. सोशल क्रेडिट मिळविण्यास इच्छुक विद्यार्थी व पालकांनी या उपक्रमात सहभागी होण्यासाठी नोंदणी करावी, असे आवाहन सेवा सहयोगतर्फे करण्यात आले आहे.

या प्रेरणादायी उपक्रमाविषयी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी कलाग्राम, सिंहगड रोड येथे सायंकाळी साडेचार ते आठ या वेळेत भेट द्यावी. अधिक माहितीसाठी ९०४९८४५९९९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सेवा सहयोग फाउंडेशनचे कार्यकारी संचालक शैलेश घाटपांडे यांनी केले आहे.

# ‘एनइपी’ नुसार शिक्षण व उद्योग संस्थांनी पूरक अभ्यासक्रम राबविले पाहिजे

## एम. शेख : पीसीयू येथे "इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ प्री समिट" चे यशस्वी आयोजन



पिंपरी (दै. संध्या) :

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण आणि उद्योग संस्थांनी एकत्र येऊन परस्पर पूरक अभ्यासक्रम राबविले पाहिजेत, त्यामुळे सध्याच्या औद्योगिक ऑटोमेशन प्रकल्पांमधील सहभागामुळे विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव यातील दरी कमी करता येईल. भविष्यात उद्योगांचे यश एकात्मिक ऑटोमेशन सोल्यूशन्स व उदयोन्मुख तंत्रज्ञानावर आधारित असेल, ज्यामुळे संस्था सतत बदलत्या डिजिटल वातावरणात स्पर्धात्मक राहतील, असे सास ऑटोमेशनचे व्यवस्थापकीय संचालक एम. शेख यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय "इंडिया एआय मिशन" अंतर्गत, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे "इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ प्री समिट" चे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

यावेळी स्पेल टेक्नॉलॉजीज कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजेंद्र कुमार शर्मा, पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, प्र - कुलगुरु डॉ. सुदीप थेपडे, एमडॉक्स इंडिया कंपनीचे अंजन बिस्वास, इंजीनियरिंग सर्व्हिसेस प्रमुख रंजीत माथुर, उपसंचालक अंजू बेनीवाल, माहिती तंत्रज्ञान तज्ञ डॉ. पूर्वा शर्मा, पीसीयू आंतरराष्ट्रीय संबंध संचालक डॉ. शंकर देवस्कार, संशोधन व विकास संचालक डॉ. भरत काळे आदी उपस्थित होते.

"स्किल इंडियाच्या दिशेने एक झेप - उद्योग आणि शिक्षण क्षेत्राच्या सहकार्यातून महत्त्वाकांक्षी तरुण भारतीय मन घडवणे" (Leap towards skill India - creating young aspiring Indian minds through industry - academia collaboration) या विषयावर शिक्षण व उद्योग क्षेत्रातील मान्यवरांची पॅनल चर्चा घेण्यात आली.

औद्योगिक विकासाचा पुढील टप्पा कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग या क्षेत्राचा आहे. विशाल दृष्टिकोन ठेवला तर उत्पादन व सेवा क्षेत्रात यामुळे मोठी गुंतवणूक आणि रोजगार संधी उपलब्ध होतील असे स्पेल टेक्नॉलॉजीज कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजेंद्र कुमार शर्मा यांनी सांगितले.

यावेळी अंजन विश्वास यांनी सांगितले की, एआय ही अणुऊर्जेप्रमाणे सर्वच क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन करणारी कार्यशक्ती आहे. पुढील काळात येणाऱ्या जबाबदाऱ्यांचा नैतिक वापर करावा लागेल. विकसित भारत घडविण्यात यांची भूमिका विशेष असेल. परंतु अंदाधुंद अवलंबित्व आणि डीप फेक पासून सावध राहिले पाहिजे.

डॉ. राजेंद्र कुमार शर्मा यांनी सांगितले की, उद्योग आणि शिक्षण क्षेत्राने एकमेकांच्या सहकार्याने कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी एआय आणि मशीन लर्निंग या तंत्रज्ञानाचा वापर करावा असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात देखील अभिप्रेत आहे.

अंजू बेनीवाल यांनी सांगितले की, हे तंत्रज्ञान वापरण्यासाठी शासन देखील सकारात्मक आहे. डॉ. पूर्वा शर्मा यांनी सांगितले की, शेती, शिक्षण याचबरोबर उदयन्मुख क्वांटम तंत्रज्ञानात देखील एआय चा वापर लाभदायी ठरेल. रंजीत माथुर यांनी सांगितले की, पर्यावरण, हवामान, प्रदूषण अशा सामाजिक प्रश्नांवर कृती कार्यक्रम तयार करण्यासाठी आणि पुढील पिढीच्या शाश्वत भविष्यासाठी हे तंत्रज्ञान मार्गदर्शक आहे.

पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या वतीने आयोजित करण्यात आलेले हे चर्चासत्र पीसीओ मध्ये होत आहे याचा आम्हाला अभिमान आहे. हे चर्चासत्र म्हणजे पुढील काळात नवी दिल्ली येथे होणाऱ्या शिखर परिषदेची पूर्वतयारी आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील उद्योग क्षेत्रातील तज्ञांची संवाद साधण्याची संधी मिळते.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, नियामक समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पंडित उपाध्याय विद्यालयात इंग्रजी माध्यम सुरु करा; मनीषा लांडे यांची मागणी

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक २० मधील संत तुकारामनगर येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय विद्यालयात इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका मनीषा शाम लांडे यांनी आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या विद्यालयात सध्या मराठी माध्यमाची शाळा सुरु आहे. प्रभाग क्रमांक २० मध्येच कासारवाडी येथे आकांक्षा फाउंडेशनच्या वतीने छत्रपती श्री शाहू महाराज इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु आहे. याच धर्तीवर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यात यावी. आकांक्षा फाउंडेशन व पिंपरी चिंचवड महापालिका यांच्या मध्ये पूर्वीच करार झाला आहे. संत तुकारामनगर मध्ये डॉ. डी. वाय. पाटील इंग्रजी माध्यमाची शाळा व जी. जी. इंटरनॅशनल या शाळा असून या शाळांमध्ये जास्त शालेय शुल्क आकारले जाते. पंडित उपाध्याय विद्यालयात इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु झाल्यानंतर प्रभागातील व आजूबाजूच्या परिसरातील सामान्य कुटुंबांतील व गोरगरीब मुलांना चांगल्या पद्धतीचे शिक्षण उपलब्ध होईल. त्यामुळे या शाळेच्या प्रस्तावासाठी आकांक्षा फाउंडेशन, महापालिकेचे संबंधित अधिकारी व स्थानिक नगरसेवकांची बैठक आयोजित करावी व पंडित उपाध्याय विद्यालयात इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्यासाठी अंमलबजावणी करावी, असे मनीषा लांडे यांनी निवेदनात म्हटले आहे. आयुक्तांना निवेदन देताना प्रभाग क्रमांक २० मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक शाम लांडे, नगरसेवक जितेंद्र ननावरे, नगरसेविका वर्षा जगताप उपस्थित होते.



### इंडो ॲथलेटिकच्या सात सायकलपटूंची नाशिक फाटा ते शेगावपर्यंत वारी

पिंपरी (दैनिक संध्या) : राष्ट्रभक्ती, अध्यात्म, संस्कृती आणि शारीरिक तंदुरुस्ती यांचा संगम साधत, इंडो ॲथलेटिक सोसायटीच्या सात सायकलपटूंनी पुणे ते शेगाव ही ४५० किमी लांब पल्ल्याची मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली. शेगाव येथे पोहोचल्यानंतर संत गजानन महाराजांचे दर्शन व आशीर्वाद घेतले. फुगेवाडी येथील मोहीम नाशिक फाटा येथून सुरू झाली. सलग तीन दिवसीय मोहीम दरम्यान पुणे-वाघोली-अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर-सिंदखेड राजा-चिखली व खामगाव मार्गे शेगाव, असा प्रवास झाला. तरुण पिढीला आरोग्यदायी जीवनशैलीकडे प्रेरित करणे, हा मुख्य उद्देश होता. या मोहिमेत गिरीराज उमरीकर, अजित पाटील, श्रीकांत चौधरी, प्रशांत तायडे, सुशील मोरे, अनुप कोहळे आणि प्रतीक पवार होते.

### मावळ पंचायत समितीवर कोणाचा झेंडा? भाजप की राष्ट्रवादी - उत्सुकता शिगेला

वडगाव मावळ (दैनिक संध्या) : सलग 20 वर्षे भाजपच्या ताब्यात असलेल्या मावळ पंचायत समितीवर पुन्हा झेंडा फडकवण्यासाठी मावळ भाजपने कंबर कसली होती, तर विधानसभेतील सलग दोन वेळा झालेल्या विजयानंतर मावळ पंचायत समितीवर झेंडा लावण्यासाठी राष्ट्रवादीने ताकद लावली होती. त्यामुळे आता मावळ पंचायत समितीवर कोणाचा झेंडा फडकणार याची उत्सुकता मावळवासीयांना लागली आहे. मावळ पंचायत समितीमध्ये सन 1992 मध्ये काँग्रेस पक्ष आणि भारतीय जनता पार्टी या दोन पक्षांमध्ये समसमान बलाबल झाल्याने चिठ्ठीद्वारे सभापती व उपसभापती निवडणूक घेण्यात आली होती. त्यावेळी सभापतिपदी भाजपचे एकनाथ तिळे व उपसभापतिपदी भाजपच्या रुपलेखा ढोरे यांची चिठ्ठी निघाली आणि मावळ पंचायत समितीवर भाजपची सत्ता आली होती. त्यानंतरच्या पाच वर्षात म्हणजे सन 1997 ते 2002 या काळात काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता होती. दरम्यान, सन 2002 मध्ये मावळ पंचायत समितीवर पुन्हा भाजपची सत्ता आली ती सलग 20 वर्षे म्हणजे सन 2022 पर्यंत कायम राहिली. त्यानंतर आजतागायत गेली चार वर्षे पंचायत समितीमध्ये प्रशासकीय कारभार सुरू आहे. एकंदर सन 2002 पासून आतापर्यंत जवळपास 24 वर्षे पंचायत समितीवर भारतीय जनता पक्षाचेच वर्चस्व असल्याचे दिसते. मावळ तालुक्यात स्व. रूपलेखा ढोरे यांच्या माध्यमातून सत्तेचा श्रीगणेशा केलेल्या भाजपने त्यानंतर स्व. दिगंबर भेगडे, संजय (बाळा) भेगडे यांच्या माध्यमातून तब्बल 25 वर्षे सलग आमदारकी कायम ठेवत सत्तेचा रौप्यमहोत्सव गाठला. त्याच पद्धतीने मध्यंतरीची पाच वर्षे वगळता तब्बल 25 वर्षे मावळ पंचायत समितीवर सत्ता कायम ठेवली.

## पिंपळे निलख, पिंपळे सौदागर परिसरात मिनी कॉम्पेक्टरमुळे कचऱ्याचा गोंधळ

■ कचरा संकलनाऐवजी रस्त्यावर सांडणारा कचरा; नागरिकांमध्ये तीव्र नाराजी

पिंपळे निलख (दै. संध्या) :

महापालिकेने व्यावसायिक परिसर व गृहनिर्माण सोसायट्यांमधील कचरा संकलन अधिक प्रभावी करण्यासाठी पिंपळे निलख, पिंपळे सौदागर आणि सांगवी परिसरात मिनी कॉम्पेक्टर गाड्या नेमल्या आहेत. मात्र, प्रत्यक्षात या गाड्यांमुळे कचरा संकलनाऐवजी परिसरात अस्ताव्यस्त कचरा पसरण्याचे चित्र दिसून येत आहे. ओला, सुका तसेच घातक कचरा एकाच डस्टबिनमधून आणि नंतर कचरा गाडीतून वाहिला जात असल्याने कचरा वर्गीकरणाला हरताळ फासला जात असल्याचे चित्र उपनगरांत दिसून येत आहे. पिंपळे निलख, पिंपळे सौदागर आणि सांगवी परिसरात कचरा संकलन करण्यासाठी मिनी कॉम्पेक्टर गाड्या येत आहेत. मात्र, त्यातील बिन लिफ्टर यंत्रणा वारंवार निकामी होत असल्याचे निदर्शनास येत आहे. परिणामी, कचरा उचलताना तो योग्यरित्या कॉम्पेक्टरमध्ये न जाता रस्त्यावर सांडत आहे. यानंतर आरोग्य कर्मचारी तो कचरा उचलण्याऐवजी तसेच सोडून निघून जात असल्याने परिसरात दुर्गंधी पसरत आहे. विशेष म्हणजे बिन लिफ्टरद्वारे कचरा उचलताना अनेक बिन अडकून तुटत आहेत. काही कुंड्या वाकड्या होऊन खराब होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. त्यामुळे दुसऱ्या दिवशी कचरा टाकतानादेखील नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. याबाबत चालक व कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता त्यांनी लिफ्टरमध्ये कधी कधी प्लास्टिक अडकून बिघाड होतो असे सांगितले.

## ठेका मिळण्यासाठी महापालिका उपायुक्तांना धमकी

पिंपरी (दै. संध्या) :

■ भाजप पदाधिकाऱ्याच्या विरोधात गुन्हा दाखल



पिंपरी चिंचवड महापालिकेत सलग दुसऱ्यांदा सत्तेत आलेल्या भाजपचा महापौर खुर्चीवर विराजमान होत नाही, तोपर्यंतच शहर भाजपच्या एका पदाधिकाऱ्याने स्वतःच्या संस्थेला ठेका मिळावा, यासाठी एका महिला उपायुक्तांच्या केबिनमध्ये घुसून मोठ-मोठ्याने बोलून ‘मी सांगतो त्याप्रमाणे नियम, अटी बदला, तसे केले नाही तर तुम्हाला बघून घेईन’, अशी धमकी देत शिवीगाळ केली. या घटनेमुळे महापालिका प्रशासनामध्ये एकच खळबळ उडाली आहे. या प्रकाराने घाबरलेल्या महिला उपायुक्ताने थेट पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. ही घटना शुक्रवारी (दि. ६) दुपारी दीडच्या सुमारास महापालिकेत घडली.

याप्रकरणी एका महिला उपायुक्तांनी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार शहर भाजपचे उपाध्यक्ष पोपट हजारे यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजपचे ८४ नगरसेवक निवडून आले आहेत. भाजपची सलग दुसऱ्यांदा बहुमताने सत्ता आली आहे. शुक्रवारीच महापालिकेत महापौरपदी रवी लांडगे आणि उपमहापौरपदी शर्मिला बाबर यांची बिनविरोध निवड झाली आहे. महापौर आणि उपमहापौर आपल्या खुर्चीवर विराजमान होताच भाजप पदाधिकाऱ्याचा मुजोरीचा प्रकार समोर आला आहे.

महापालिकेच्या एका विभागातील कंत्राट भाजपचे शहर उपाध्यक्ष पोपट हजारे यांच्या ‘सन राईज फाऊंडेशन’ संस्थेला मिळावे, यासाठी त्यांनी महिला उपायुक्तांच्या केबिनमध्ये घुसून नियम बदलण्यासाठी दडपशाहीचा प्रयत्न केला. यावर संबंधित उपायुक्तांनी कंत्राटाबद्दल माहिती सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, हजारे यांनी त्यांचे न ऐकता मी सांगतो, त्याप्रमाणे तुम्ही नियम व अटी बदला, मला काही माहिती, तुम्ही तसे केले नाही तर बघून घेईन, अशी धमकी देत मोठ-मोठ्याने बोलून सर्व कर्मचाऱ्यांसमोर शिवीगाळ केली. या प्रकाराने घाबरलेल्या महिला उपायुक्तानी थेट पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

दरम्यान, संबंधित उपाध्यक्षाने सर्व आरोप फेटाळले आहेत. ‘मी कोणतीही धमकी दिली नाही. हे कामकाज माझ्या संस्थेला मिळावे यासाठी केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय मंत्रालयाने पत्र दिले आहे. महापालिकेने निविदा प्रक्रिया राबवून छत्रपती संभाजीनगर येथील संस्थेला काम दिले. शहरात काम करणारी संस्था असून डावलले आहे,’ असा दावाही त्यांनी केला.

## वाहन चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

### महाळुंगे पोलिसांकडून १३ मोटारसायकली जप्त



पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने वाहन चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ५ लाख ५० हजार रुपये किमतीच्या एकूण १३ मोटारसायकली जप्त केल्या असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

औद्योगिक परिसरात सातत्याने होत असलेल्या दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार महाळुंगे पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलीस अंमलदार शुभम खंडागळे यांना आरोपी आंबेठाण चौक, चाकण परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचत निलेश राजू मंडलीक आणि संदीप साहेबराव सोनवणे या दोन आरोपींना अटक केली.

तपासात आरोपींनी चाकण एमआयडीसी व आसपासच्या परिसरातून दुचाकी वाहने चोरून त्यांची विक्री केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून स्प्लेंडर, पल्सर, पॅशन प्रो आदी प्रकारच्या एकूण १३ मोटारसायकली जप्त केल्या आहेत. हे गुन्हे उत्तर महाळुंगे, दक्षिण महाळुंगे, शिक्रापूर, करमाळा, चतु:श्रृंगी आणि चाकण पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिगंबर सूर्यवंशी, सहायक पोलीस निरीक्षक कल्याण घाडगे व त्यांच्या तपास पथकाने पोलीस उप आयुक्त श्वेता खेडकर आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

## पिंपरी-चिंचवडमधील पवना, इंद्रायणी व मुळा नद्यांचे प्रदूषण वाढले

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड शहरातील पवना, इंद्रायणी आणि मुळा या तिन्ही नद्यांचे प्रदूषण वाढल्याच्या तक्रारी शहरातील पर्यावरणप्रेमी नागरिकांनी केल्या आहेत. त्यामुळे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पथकाने तिन्ही नद्यांचे पाणी तपासणीसाठी घेतले आहेत.

नद्यांच्या पाण्याची गुणवत्ता तपासून त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या पथकाकडून अहवाल दिला जाणार आहे. शहराच्या हद्दीतून पवना नदीची लांबी 24.40 किलोमीटर, इंद्रायणी नदीची लांबी 20.60 किलोमीटर आणि मुळा नदीची लांबी 12.40 किलोमीटर आहे. शहरातील नदी प्रदूषणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. शहरातील नाल्यांद्वारे मैलासांडपाणी, तसेच कारखान्यांचे रसायनयुक्त सांडपाणीही थेट नदीत मिसळते. शहरीकरणामुळे पवना, इंद्रायणी व मुळा नदीचे प्रदूषण वाढले आहे. पवना नदी किवळेपासून ते दापोडीपर्यंत, इंद्रायणी नदी तळवडेपासून, तर आळंदीपर्यंत आणि मुळा नदी वाकडपासून दापोडीपर्यंत प्रदूषित होत असल्याचे आढळून आले आहे. दरम्यान, शहरातील पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून नद्याचे प्रदूषणावर उपाययोजना करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. अनेक पर्यावरणप्रेमी नागरिकांनी प्रदूषणाबाबत तक्रारी केलेल्या आहेत.

त्यानुसार नद्याचे प्रदूषण आणि पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील पवना, इंद्रायणी व मुळा नद्याच्या पाण्याचे नमुने नुकतेच घेण्यात आले आहेत.

## स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा हा नागरिकांचा हक्क, तर तो मिळवून देणे माझी जबाबदारी

### महापौर रवि लांडगे

### महापौर रवि लांडगे यांनी केली निगडी व चिखली जलशुद्धीकरण केंद्रांची पाहणी

पिंपरी (दै. संध्या) :



पिंपरी चिंचवड शहराच्या झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा यंत्रणा अधिक सक्षम व सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने महापौर रवि लांडगे यांनी आज निगडी व चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान शहराला लागणारी एकूण पाण्याची गरज, महापालिकेच्या वतीने सध्या करण्यात येणारा पाणीपुरवठा, तसेच भविष्यातील वाढती मागणी लक्षात घेता राबविण्यात येत असलेल्या व प्रस्तावित उपाययोजनांबाबत त्यांनी सविस्तर माहिती घेतली.

या पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, चीफ केमिस्ट डॉ. प्रशांत जगताप, कार्यकारी अभियंता विजयसिंग भोसले, महेश बरीदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पाणीपुरवठा विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

चिखली परिसरासाठी सध्या इंद्रायणी नदीवरील निगोजे बंधाऱ्यातून दररोज ९० एमएलडी पाणी घेण्यात येते. हे पाणी चिखली येथील जलशुद्धीकरण प्रकल्पात शुद्ध करून परिसरातील नागरिकांना वितरित करण्यात येते. याशिवाय भविष्यातील वाढती पाण्याची गरज लक्षात घेता भामा आसखेड धरणातून येणाऱ्या पाण्यासाठी २०० एमएलडी क्षमतेचा स्वतंत्र जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचे काम सध्या सुरू आहे. याबाबत महापौर रवि लांडगे यांनी पाहणी करून सविस्तर माहिती घेतली. तसेच निगोजे येथील सध्याची पंपिंग व्यवस्था ही आंद्रा धरणातून थेट जलवाहिनी कार्यान्वित होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात वापरण्यात येत आहे, याबाबतही त्यांनी सविस्तर आढावा घेतला. यानंतर निगडी येथील सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्राची महापौर रवि लांडगे यांनी पाहणी केली. यावेळी संगणकीय सादरीकरणाद्वारे त्यांनी केंद्राबाबत सविस्तर आढावा घेतला. हे जलशुद्धीकरण केंद्र सुरुवातीला ११४ एमएलडी क्षमतेने कार्यान्वित करण्यात आले होते. मात्र शहराचा विस्तार, नवीन निवासी व औद्योगिक क्षेत्रांची वाढ आणि पाण्याच्या मागणीत झालेली लक्षणीय वाढ लक्षात घेता या केंद्राचा टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यात आला आहे.

सध्या हे केंद्र ५५० एमएलडी क्षमतेने कार्यरत असून पवना नदीतील पाण्यावर प्रक्रिया करून तसेच पंपिंग व्यवस्थेच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सुमारे ७५ टक्के क्षेत्राला पाणीपुरवठा केला जात आहे. पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया, गुणवत्ता तपासणीचे निकष आणि वितरण व्यवस्थेची माहितीही यावेळी महापौर यांना देण्यात आली.

या पाहणीदरम्यान भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्प, पवना बंद जलवाहिनी प्रकल्प, पाणी उचल, शुद्धीकरण व वितरणाची साखळी, पाण्याच्या गुणवत्तेची नियमित तपासणी प्रक्रिया तसेच शहरातील विविध भागांतील पाण्याच्या टाक्यांची क्षमता व स्थिती याबाबत मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे व सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी यांनी माहिती दिली.

यावेळी महापौर रवि लांडगे यांनी शहरातील नागरिकांना भविष्यातही नियमित, पुरेशा दाबाने आणि दर्जेदार पाणीपुरवठा होण्यासाठी पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले आणि त्यासाठी अधिकाधिक दर्जेदार उपाययोजना राबविण्यावर भर देणे गरजेचे असल्याचे सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शिरूर तालुक्यात मतदानाचा टक्का वाढला

■ वाढलेला टक्का कोणाच्या पथ्यावर पडणार?

कवठे येमाई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये चांगली रंगत आलेली असताना शिरूर तालुक्यामध्ये बहुतांश ठिकाणी चौरंगी लढती पर्यंत चित्र असताना वाढलेल्या मतदानाच्या टक्केवारीचा कोणाला फायदा होणार हा प्रश्न सर्वसामान्य मतदारांना पडला आहे.मतदार मतदानासाठी स्वयंस्फुतीने घराबाहेर पडले असून त्यांचा उत्साह पाहता ग्रामीण भागाच्या विकासाला कलाटणी देणाऱ्या या निवडणूकीतून उद्याचे विकसीत भवितव्य काय असेल याची उत्सुकता तालुक्यातील जनतेला लागली आहे.शिरूर तालुक्यात तीन माजी आमदार पोपटराव गावडे,ॲड.अशोक पवार,दिवंगत आमदार बाबुराव पाचर्णे यांच्या घरांचे अस्तित्व पणाला लागले असून मतदार त्यांना तारणार की,वेगळा निकाल लागणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. एकंदरीत जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणूकीचे चित्र नऊ तारखेला स्पष्ट होणार असल्याने मतदार संभ्रमात पडले आहेत.तालुक्यातील या निवडणूका अत्यंत चुरशीच्या झाल्याने कोण जिंकेल आणि कोणाला थांबावे लागेल हे आत्ताच तरी काही सांगता येत नसले तरी तालुक्यातील सर्व उमेदवार कार्यकर्त्यांमध्ये आपलाच उमेदवार विजयी होणार हा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये बळवलेला दिसून येत आहे.



### पवार कुटुंबीयांच्या बैठकांचे सत्र सुरूच

बारामती (दैनिक संध्या) : बारामतीत पवार कुटुंबातील महत्त्वाच्या व्यक्तींच्या बैठकांचे सत्र सुरूच आहे. शनिवारी सलग चौथ्या दिवशी पवार कुटुंबीयांची बैठक विद्या प्रतिष्ठान येथे झाली. आजच्या बैठकीला ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, रोहित पवार, राजेंद्र पवार, अजित पवार यांचे पुत्र पार्थ आणि जय पवार उपस्थित होते. अजित पवार यांच्या निधनानंतर गेल्या चार दिवसांत सलग पवार कुटुंबांच्या विद्या प्रतिष्ठान आणि सहयोग या अजित पवारांच्या निवासस्थानी भेटी होत आहेत. या भेटीची वारंवारताही वाढलेली आहे. यावरून राजकीय तर्कवितर्क लावले जात आहेत. परंतु यासंदर्भात कोणीही औपचारिक किंवा अनौपचारिकरीत्या बोलण्यास तयार नाही. रोहित पवारांनी मात्र आपण यासंदर्भात 10 आणि 12 तारखेला बोलू, असे सांगितले आहे. विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्तपदी अजित पवार यांच्या जागी त्यांच्या कुटुंबातील कोणाला घ्यायचे आणि अजितदादांचे विद्या प्रतिष्ठानमधील स्मारक या भोवतीच पवार कुटुंबाची चर्चा होत असल्याचे सांगितले जात असले, तरी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण आणि राजकीयदृष्ट्या संपूर्ण पवार कुटुंब एकत्र येणे या संदर्भातही काही महत्त्वपूर्ण चर्चा होत असल्याचे समजते. राजकीयदृष्ट्या सध्या पवार कुटुंब अडचणीत असल्यामुळे सर्व कुटुंब राजकीयदृष्ट्या एकत्रितपणे भक्कमपणे उभे राहिले पाहिजे, असे कुटुंबातील सर्व घटकांचे मत असल्यामुळे त्यासंदर्भातही या बैठकीत चर्चा होत असल्याचे समजते. विलीनीकरणासंदर्भात सध्या वेगवेगळे नेते त्यांची मते व्यक्त करत असले, तरी अंतिमत: पवार कुटुंब एकत्र होऊन जो निर्णय घेईल तोच महत्त्वाचा ठरणार असल्याने या बैठकांना महत्त्व प्राप्त झाले.

### आंबेगाव तालुक्यात शांततेत मतदान; 65.3 टक्के मतदानाची नोंद

मंचर (दैनिक संध्या) : आंबेगाव तालुक्यातील ५ जिल्हा परिषद गट आणि १० पंचायत समिती गणांसाठी एकूण २३९ मतदान केंद्रांवर मतदान आकडेवारीनुसार ९३,१८९ पुरुष मतदारांपैकी ६३,७२८ पुरुषांनी, ९०,८५७ महिला मतदारांपैकी ५६,४५३ महिलांनी तसेच ६ तृतीयपंथी मतदारांपैकी १ मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावला.याप्रमाणे एकूण मतदानाची टक्केवारी सुमारे ६५.३ टक्के इतकी नोंदविण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सतीश थेटे, तहसीलदार डॉ.सचिन वाघ, नायब तहसीलदार सचिन मुंढे ,अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पडली.या निवडणुकीसाठी जॉइंट कमिशनर पीएमआरडीए पूनम मेहता या मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत.मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व मतदान पथके शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी येथे स्थापन करण्यात आलेल्या संकलन केंद्रात सुरक्षितरीत्या परतली. मतदानानंतर सर्व ईव्हीएम व मतदान साहित्य शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी येथील स्ट्रॉंग रूममध्ये सुरक्षित ठेवण्यात आले असून शनिवार दि.७ रोजी रात्री १०.३० वाजता राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्रॉंग रूम सील करण्यात आले. जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती आंबेगाव–२०२६ निवडणुकांची मतमोजणी सोमवार, दि. ९ रोजी सकाळी १० वाजता शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी येथे होणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे यांनी सांगितले.

### श्री तपनेश्वर महाशिवरात्री महोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

मंचर (दैनिक संध्या) : श्री तपनेश्वर मंदिर, भिमाशंकर रोड, मंचर (ता. आंबेगाव) येथे महाशिवरात्री महोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन सोमवार दि. ९ ते सोमवार दि. १६ या कालावधीत सप्ताहाचे नियोजन करण्यात आले. सप्ताहात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ७.३० ते ९ शिवलीलामृत ग्रंथ पारायण (विठ्ठल मंदिर ज्ञानेश्वरी पारायण मंडळ, मंचर), सकाळी १० ते १२ गाथा भजन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ व हरिकिर्तन, सायंकाळी ७ ते ९ किर्तन आणि रात्री ९ ते ११ अन्नप्रसाद असा कार्यक्रम होणार आहे. साप्ताह काळात हर्षद महाराज पारखे, रोहित महाराज शेवाळे सिद्धेश महाराज वाबळे, ओमकार महाराज भोर,तन्वीताई महाराज विश्वासराव, अविष्कार महाराज पोखरकर, प्रशांत महाराज पाबळे यांची कीर्तने होणार आहे.सोमवार दि.१६ रोजी मयूर महाराज बोडके यांचे काल्याचे किर्तन त्यानंतर दुपारी १२ वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.या सप्ताहासाठी मंचर वारकरी संप्रदाय मंडळ, चिंचपुरेमळा, बाणखेलेमळा (पांढरीचामळा), मोरडेवाडी, निघोटवाडी, शेवाळवाडी, मंचर नगरपंचायत तसेच विविध गावांतील वारकरी मंडळांचे सहकार्य लाभले आहे.

# तांत्रिक कामगार युनियन यांचे २ रे राज्यव्यापी द्विवार्षिक महाअधिवेशन

राजगुरुनगर (दै. संध्या)



राज्यातील वीज उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेल्या तांत्रिक कामगारांच्या हक्क, सुरक्षितता, स्थैर्य व न्यायासाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या तांत्रिक कामगार युनियन यांचे २ रे राज्यव्यापी द्विवार्षिक महाअधिवेशन रविवारी ( दि.8 ) पुणे जिल्ह्यातील आळंदी येथे संपन्न होणार असल्याची माहीती तांत्रिक कामगार युनियनचे केंद्रीय सरचिटणीस प्रभाकर लहाने यांची प्रसिध्द केलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

नवी दिशा नवा विचार घेऊन आयोजित या महाअधिवेशनात राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो तांत्रिक कामगार, पदाधिकारी, कार्यकर्ते व प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. वीज उद्योगातील बदलती धोरणे, खाजगीकरण, फ्रेंचायझीकरण, स्वतंत्र वेतन श्रेणी, वर्ग ४ च्या तांत्रिक कामगारांना यंत्र चालक पदावर सामावून घेणे, निवृत्ती वेतन, कर्मचारी पुनर्रचना, सरळसेवा भरती, अपघातांचे वाढते प्रमाण, सुरक्षिततेचा अभाव, कंत्राटी कामगारांचे प्रश्न या सर्व ज्वलंत विषयांवर या अधिवेशनात सखोल चर्चा होणार आहे.

महाअधिवेशनाचे उदघाटन विधानपरिषद सभापती मा. राम शिंदे यांच्या हस्ते होणार असून ध्वजारोहन राज्याचे आरोग्यमन्त्री नामदार प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष दिलीप कोरडे राहणार आहेत.

या कार्यक्रमास विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे, उर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर व महावितरण कंपनीचे, मानव संसाधन संचालक राजेंद्र पवार उपस्थित राहणार आहेत.

यावेळी भक्ती शक्ती स्मरणिका 2026 चे प्रकाशन खेडचे आमदार बाबाजी काळे, तांत्रिक डायरी 2026 चे प्रकाशन आमदार डॉ. सत्यजित, तांबे, रक्तदान शिबराचे उद्धघाटन शिवाजीराव खटकाळे तर सुरक्षा पुस्तिकाचे प्रकाशन महावितरण कंपनीचे कार्यकारी संचालक धनंजय औढेकर, स्फूर्ति गितार्पन तांत्रिक कामगारांचे जेष्ठ नेते बी.बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी महापारेषण कार्यकारी संचालक, मानव संसाधन सुचिता भिकाणे, महावितरण कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर, परेश भागवत, महानिर्मिती, कार्यकारी संचालक, नितीन वाघ, पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, महावितरण मुख्य महाव्यवस्थापक सुचित्रा गुजर, भुषण कुळकर्णी, महापारेषण मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, पुरुषोत्तम वारजुरकर, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड उपस्थित राहणार आहेत.

प्रमुख अतिथी म्हणून महावितरण पुणे परिमंडाळाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे, जनसंपर्क अधिकारी विकास आढे. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भूपेंद्र वाघमारे, आळदी नगराध्यक्ष प्रशात कुऱ्हाडे, माजी नगराध्यक्ष रोहीदासभाऊ तापकीर उपस्थित राहणार आहेत. या महाअधिवेशनास राज्यातील तिन्ही कंपनीतील तांत्रिक कामगारांना हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन तांत्रिक कामगार युनियन चे उपाध्यक्ष बी.आर पवार, गोपाल गाडगे, सतिश भुजबळ, सरचिटणीस प्रभाकर लहाने, उपसरचिटणीस नितीन चव्हाण, शिवाजी शिवनेचारी, संजय उगले, विलास डवर , केंद्रीय संघटक महेश हिवराळे, आर.आर. ठाकुर, अरूण यावले, मनोज मोरे, श्रीराम वाकचौर, राज्य सचिव आनंद जगताप रघुनाथ लाड, प्रकाश निकम, बाबासाहेब काटे, कोषाध्यक्ष गजाननन अघम, मुख्य कार्यालय प्रतिनीधी दत्तु भोईर, महिला प्रतिनिधी शुभांगी मुचंडे,प्रसिध्दी प्रमुख अनिल सरोदे, तांत्रिक टाईम्स संपादक सुनिल सोनवणे, विवेक बोरकर, विक्की कावळे, प्रदिप पाटील, प्रकाश वाघ, किरण कऱ्हाळे यांनी केले आहे.

## मतमोजणीपूर्वीच विजय मिरवणुकीची तयारी

**उमेदवारांचे नियोजन पूर्ण**

मंचर (दै. संध्या)

आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतमोजणीपूर्वीच काही उमेदवारांकडून संभाव्य विजय उत्सवासाठी जोरदार तयारी करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. निवडणूक निकाल लागल्यानंतर विजयी उमेदवारांची मिरवणूक काढण्यासाठी अनेकांनी विजयी रथ सज्ज ठेवले असून झांज पथके, फटाके, गुलाल, भंडारा आणि फेट्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. काही ठिकाणी समर्थकांसाठी जेवणाचीही नियोजनबद्ध तयारी केल्याचे बोलले जात आहे.मतमोजणी संपल्यानंतर अधिकृत घोषणा होताच विजयी उमेदवारांचे स्वागत आणि मिरवणुका काढण्यासाठी कार्यकर्ते सज्ज असल्याचे दिसून येत आहे.गावागावांतून समर्थकांना एकत्र आणून उत्सवाचे नियोजन करण्यात आले असून वातावरणात उत्सुकता वाढली आहे.मात्र, प्रशासनाच्या नियमांचे पालन करूनच मिरवणुका काढाव्यात, असे आवाहनही करण्यात येत आहे. सध्या सर्वांचे लक्ष सोमवार दि. ९ रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले असून कोणत्या उमेदवाराचा विजय होणार आणि कोणाची मिरवणूक निघणार, याबाबत मोठी उत्सुकता आहे. निकाल जाहीर होताच तालुक्यातील राजकीय वातावरण आणखी रंगणार असल्याची चिन्हे दिसत आहेत.

## येडगाव परिसरात कृषी पंप केबल चोरीचे सत्र पुन्हा सुरू

### ३० ते ४० शेतकऱ्यांचे सात ते आठ लाखांचे नुकसान; पोलिसांकडून ठोस कारवाईची मागणी

नारायणगाव (दै. संध्या)



येडगाव परिसरामध्ये शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या केबल चोरी जाण्याचे सत्र पुन्हा सुरू झाले आहे. रविवारी मध्यरात्री सुमारे 30 ते 40 शेतकऱ्यांच्या विद्युत पंपाच्या केबल चोरट्याने चोरून नेऊन शेतकऱ्यांचे सुमारे सात ते आठ लाख रुपयांचे नुकसान केले आहे.

दरम्यान दरवर्षीच्या परिसरामध्ये शेतकऱ्यांच्या केबल चोरी जात आहेत परंतु पोलिसांना मात्र या चोरांचा शोध लागत नाही, अशी व्यथा येथील शेतकरी शरद मेहरकर यांनी व्यक्त केली आहे.\

येडगाव धरणाजवळ इंदिरानगर परिसरामध्ये शेतकऱ्यांचे धरणाच्याकाठी कृषी पंप आहेत. काही शेतकऱ्यांची एकत्रित सिंचन योजना आहे. दरवर्षी या भागातील शेतकऱ्यांच्या विद्युत पंपाच्या केबल चोरीचे प्रकार होत आहेत. प्रत्येक वेळी केबल चोरी गेली की शेतकऱ्यांनी नवीन केबल आणून बसवायची व पुन्हा केबलची चोरी होते असा प्रकार गेल्या चार पाच वर्षापासून सुरू आहेत. या केबलचोरीमुळे या परिसरातील शेतकरी त्रस्त झाले आहेत. पोलीस यंत्रणेने या चोरांचा तातडीने शोध लावावा अशी या परिसरातील शेतकरी वर्गाची मागणी आहे.

अनेकदा पोलीस ठाण्यात तक्रार करूनही त्याचा पुढे तपास लागत नसल्यामुळे शेतकरी तक्रारी करण्याबाबत धजावत नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान होत असेल तर बळीराजांनी करायचं काय? शेतामध्ये पिकवलेल्या पिकाला बाजार भाव योग्य मिळत नसल्याने शेतकरी अगोदरच आर्थिक संकटात सापडला आहे आणि त्यात केबल चोरीची भर पडल्यामुळे बळीराजाचे अर्थकारण पूर्णपणे कोलमडून जात आहे.

दरम्यान हे केबल चोर मध्यरात्रीनंतर अथवा पहाटेच्या वेळी कृषी पंपाच्या केबल चोरून नेते आहेत. ओके बोल नंतर जाळून त्यातील तांब्याची तार विक्री केली जात आहे. जुन्नर तालुक्यामध्ये या तांब्याच्या तारा कुठे विक्री होतात याचा शोध पोलिसांनी घेणे गरजेचे आहे.या परिसरात केबल चोरी करणारे चोरटे चटावलेले असून आपल्यावर कोणतीच कारवाई होत नाही याची त्यांना खात्री झाल्याने असे प्रकार दरवर्षी घडत आहेत. गुन्हे अन्वेषण विभागाने या शेतकऱ्यांच्या केबल चोरीचा छडा लावून शेतकऱ्यांना मनस्ताप देणाऱ्या चोरट्यांना अद्दल घडवावी अशी मागणी या परिसरातील त्रस्त शेतकरी व्यक्त करीत आहेत.

## मतदानाच्या पूर्वसंध्येला खेड तालुक्यात दगडफेक

**राष्ट्रवादी उमेदवाराच्या पतीवर हल्ला**

राजगुरुनगर (दै. संध्या)

■ माजी जि. प. सदस्य शरद बुट्टे पाटील गंभीर जखमी; अनोळखी हल्लेखोरांविरोधात गुन्हा दाखल




जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शरद बुट्टे पाटील यांच्या वाहनावर हल्ला करण्यात आला असून त्यात ते गंभीर जखमी झाले आहेत.पाईट - आंबेठाण जिल्हा परिषद गटात शुक्रवारी (दि ६) रात्री ९ वाजण्याच्या सुमारास ही दगडफेकीची घटना घडली. या हल्ल्यात स्कॉर्पिओ गाडीवर (क्र. एमएच १४ एलयू ७०७४) अनोळखी इसमांनी दगडफेक केल्याने गाडीच्या काचा फुटल्या आणि गाडी चालवत असलेल्या शरद आनंदराव बुट्टे पाटील (वय ४९, रा. वराळेगाव, ता. खेड) यांच्या कपाळावर दगड लागून गंभीर जखम झाली. त्यांच्यासोबत असलेले त्यांचे मित्र संदीप सुदाम मिरजे यांनाही किरकोळ दुखापत झाली.

संदीप सुदाम मिरजे यांनी म्हाळुंगे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दिलेल्या तक्रारीनुसार, ते आणि त्यांचे मित्र शरद बुट्टे पाटील हे रात्री ८ वाजता खेड येथून निघाले होते. ते आपला आजारी मित्र राहुल तरडे (रा. आसखेड) यांना भेटण्यासाठी शरद बुट्टे पाटील यांच्या स्कॉर्पिओ गाडीने आसखेड गावात गेले. राहुल तरडे हे साळुंखे हॉस्पिटलमध्ये दाखल असल्याचे कळल्याने चहापाणी करून ते सुमारे रात्री ८.४५ वाजता धामणे गावाकडे निघाले.

आसखेड ते धामणे रस्त्यावर, आसखेड-धामणे गावाजवळील शिवे परिसरात रात्री ९ वाजण्याच्या सुमारास रस्त्यावर दगड पडलेले पाहून शरद बुट्टे पाटील यांनी गाडीचा वेग कमी करून गाडी थांबवली. त्याचवेळी धामणे गावाकडून येणाऱ्या दिशेने २ ते ३ अनोळखी इसमांनी १०-१५ फूट अंतरावरून गाडीवर ५ ते ६ ओबडधोबड दगड फेकले. यामुळे स्कॉर्पिओची काच फुटली. दोघेही डोके खाली घालून बसले असताना एक दगड शरद बुट्टे पाटील यांच्या कपाळावर लागला. मागून येणाऱ्या टू-व्हीलरच्या हेडलाइटमुळे प्रकाश पडल्यावर हल्लेखोर पळून गेले. अंधारामुळे त्यांची ओळख पटली नाही.

संदीप मिरजे गाडीतून उतरताना पडले आणि त्यांनाही कपाळावर किरकोळ जखम झाली. जवळच येणाऱ्या टू-व्हीलर चालकाने मदत केली. नंतर ओळखीच्या लोकांना फोन करून बोलावले आणि दोघांना बालाजी हॉस्पिटल, भांबोली येथे नेण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार घेतल्यानंतर संदीप मिरजे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या घटनेत गाडीचे मोठे नुकसान झाले असून, शरद बुट्टे पाटील यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

या हल्ल्यामागे कोणती कारणे आहेत याचा तपास सुरू असून, अनोळखी इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडली असून, शरद बुट्टे पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनीता बुट्टे यांचे पती आणि माजी जिल्हा परिषद सदस्य आहेत. निवडणुकीच्या पूर्वसंध्येला अशा प्रकारची हिंसक घटना घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई सुरू केली आहे.

## मतदानानंतर उमेदवारांची नजर मतमोजणीकडे

**पंधरा दिवसांच्या धावपळीला विश्रांती**

मंचर (दै. संध्या)



आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत गेल्या पंधरा दिवसांपासून उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांची प्रचंड धावपळ सुरू होती. प्रचार सभा, पदयात्रा, घरोघरी भेटी, गावभेटी आणि कार्यकर्त्यांच्या बैठका अशा विविध माध्यमांतून मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात कष्ट घेतले. ग्रामीण भागातील दुर्गम वाड्या-वस्त्यांपर्यंत जाऊन मतदारांशी संपर्क साधण्यासाठी दिवसरात्र मेहनत घ्यावी लागली.मतदानाचा दिवस पार पडल्यानंतर आता या सर्व धावपळीला थोडी विश्रांती मिळाली असून उमेदवार व समर्थकांचे लक्ष सोमवार, दि,९ रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे. गेल्या काही दिवसांत घेतलेल्या परिश्रमांचे फलित काय लागणार, याची उत्सुकता सर्वांनाच लागून राहिली आहे. काही ठिकाणी विजयी होण्याचा आत्मविश्वास दिसत असला तरी निकालाबाबत अनिश्चिततेचे वातावरणही जाणवत आहे.मतमोजणीच्या दिवशीच कोणाचा विजय होणार आणि कोणाला पराभव स्वीकारावा लागणार, हे स्पष्ट होणार आहे. त्यामुळे उमेदवार, कार्यकर्ते आणि मतदारांमध्ये प्रचंड उत्सुकता असून तालुक्यात सध्या प्रतीक्षेचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्वांचे लक्ष आता मतमोजणीच्या निकालाकडे लागले आहे.

## वनविभाग जुन्नर येथे बालविवाह मुक्त भारतासाठी जागरुकता कार्यक्रम संपन्न

नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर वनविभाग शिवराय संकुल बारव जुन्नर येथे जिल्हा न्यायाधीश- १ तथा तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष एस.बी.शेलार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाणी व फौजदारी न्यायाधीश जुन्नर श्रीमती. एस. टी. घुले साहेब यांच्या अध्यक्षतेखाली १०० दिवसांसाठी बालविवाह मुक्त भारतासाठी सखोल जागरुकता मोहीम मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रम पत्रिकेनुसार कायदेविषयक शिबीर व महिला आणि बालविकास मंत्रालय आयोजित ०४ डिसेंबर २०२५ पासून १०० दिवसांसाठी बालविवाह मुक्त भारतासाठी सखोल जागरुकता मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबीरात जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे उपाध्यक्ष ॲड. निलीमा शेरकर, सचिव ॲड. पुराणिक नलावडे, ग्रंथपाल ॲड. समकित नानावटी, ॲड. तय्यब पठाण, ॲड. तबस्सुम पठाण, ॲड. सलमा सय्यद, ॲड. रणजित भगत, ॲड. विनोद खंडागळे, ॲड. मंजिरी कोल्हे, ॲड.राजेंद्र कोल्हे, ॲड.करण खंडागळे, तसेच जुन्नर तालुका विधी सेवा समिती समन्वयक प्रशांत मोरतळे तसेच परिविक्षाधिन उपवनसंरक्षक लोकेश पाटील, सहाय्यक वनसंरक्षक स्मीता राजहंस, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदिप चव्हाण, वनपाल सोनल भालेराव यांसह जुन्नरचे वनविभागाचे महिला व पुरुष कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबीराचे अध्यक्ष श्रीमती. स्वप्ना घुले, साहेब म्हणाले की “कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला प्रतिबंध केला पाहिजे. भारतीय राज्यघटना ही सर्वोच्च आहे. त्यामधील कलम २१ नुसार प्रत्येक व्यक्तिला जगण्याचा व व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे. आपल्याला घटनेने दिलेल सर्व अधिकार व कर्तव्य यांचे संरक्षण करण्यासाठी विविध कायदे केले जातात. त्या कायद्यांचा दुरुपयोग न करता कायद्यांचा चांगल्या हेतूने उपयोग केला पाहिजे असे प्रतिपादन केले.

तसेच घर घर में न्याय की जागृती व राष्ट्रीय लोकअदालतीचा प्रचार व प्रसार या विषयावर ॲड. निलीमा शेरकर, बालविवाह विरुध्द सखोल जागरुकता व मुलींवरील हिंसाचाराचे उच्चाटण करणे या विषयावर ॲड. तबस्सुम पठाण, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळाविरुध्द जागरुकता, या विषयावर ॲड. सलमा सय्यद, पोलीस ठाणे जेल आणि इतर संबंधित ठिकाणी कायदेशीर हक्क या विषयावर ॲड. रणजित भगत, नालसाच्या आदिवासींच्या हक्कांविषयी माहिती प्रसारित करणे तसेच सरकारी कल्याणकारी योजना व मोफत कायदेशीर मदत योजना या विषयावर ॲड. विनोद खंडागळे, मानवी वन्यजीव संघर्षातील पिडीतांना न्याय मिळावा यासाठी नालसा योजनेनुसार मानवी वन्यजीव संघर्षप्रवण भागात कायदेशिर साक्षरता शिबिर या विषयावर ॲड. मंजिरी कोल्हे यांनी या विषयावर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाची प्रस्तावना न्यायालयीन कर्मचारी प्रशांत मोरतळे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक वनसंरक्षक स्मीता राजहंस यांनी तर आभार प्रदर्शन वनपाल सोनल भालेराव यांनी केली. सदर १०० दिवसांसाठी बालविवाह मुक्त भारतासाठी सखोल जागरुकता मोहीम व कायदेविषयक शिबिर मोठया उत्साहात यशस्वीरित्या पार पडले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### उद्धव ठाकरे पुन्हा परिषदेवर? मविआची कोंडी वाढली; भाजपला ॲडव्हान्टेज, नवे चेहरे येणार

मुंबई (दैनिक संध्या) : उद्धवसेनेचे पक्षप्रमुख, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह विधान परिषदेच्या नऊ आमदारांचा कार्यकाळ लवकरच संपणार असून, ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर जातील का, याबाबत उत्सुकता असेल. विधान परिषदेच्या निवडणुकीत भाजप-महायुतीला बहुतांश जागा मिळतील असे चित्र आहे. महाविकास आघाडीला फटका बसेल. विधानसभेच्या सदस्यांमधून हे नऊजण विधान परिषदेवर मे २०२० मध्ये बिनविरोध निवडून गेले होते. त्यावेळी महाविकास आघाडीला पाच, तर भाजपला चार जागा मिळाल्या होत्या. मात्र यावेळी महायुतीचे संख्याबळ तब्बल २३५ इतके आहे. मविआकडे माकप, शेकाप मिळून ४८ विधानसभा सदस्य आहेत. अन्य दोन पक्षांचे तीन आमदार आहेत. दोन जागा रिक्त आहेत. मेमधील विधान परिषद निवडणुकीपूर्वी विधानसभेच्या दोन जागांसाठी पोटनिवडणूक झाली तर विधानसभेचे सर्व २८८ आमदार विधान परिषदेसाठी मतदान करतील. विधान परिषदेच्या आधी सात जागांसाठी राज्यसभा निवडणूक होणार आहे. त्यात मविआला एक जागा मिळेल, असे संख्याबळ सांगते. ती जागा मविआतील एका पक्षाला दिली गेली, तर दुसऱ्या पक्षाला विधान परिषदेची एक जागा दिली जाईल. भाजपाचे चारपैकी तीन जण गोपीचंद पडळकर, प्रवीण दटके, रमेश कराड हे विधानसभेवर निवडून गेलेले आहेत. त्यामुळे नवीन चेहरे पक्षाकडून दिले जातील. सोलापूरच्या राजकारणात गेल्या काळात झालेल्या घडामोडींनंतर दुरावलेले रणजितसिंह मोहिते पाटील यांच्याबाबत भाजपा काय निर्णय घेणार ते महत्त्वाचे असेल. उद्धव ठाकरे यांनी विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा राजीनामा देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देताना केली होती; पण नंतर त्यांनी राजीनामा दिला नाही. यावेळी ते स्वतः विधान परिषदेवर जाण्यासाठी इच्छुक असतील का आणि मविआ एकमताने त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करेल का, हे महत्त्वाचे असेल. २० विधानसभा सदस्य असलेल्या उद्धवसेनेने राज्यसभेच्या एका जागेसाठी काँग्रेस वा शरद पवार गटाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला, तर ठाकरे विधान परिषदेवर जाणार असा त्याचा अर्थ असू शकेल. मविआतील पक्षांना राज्यसभा व विधान परिषदेसाठी तडजोड करावी लागणार आहे. त्याचवेळी इच्छुकांची गर्दी असल्याने कोणाला संधी द्यायची हे आव्हान भाजपसमोर असेल.

### पुण्यातील जमीन घोटाळ्याच्या प्रकरणात एकनाथ खडसे दाम्पत्याविरोधात वॉरंट

मुंबई (दैनिक संध्या) : पुण्यातील भोसरी भूखंड घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात आरोप निश्चित करण्यात येणार असतानाही राष्ट्रवादीचे (शरद पवार) नेते एकनाथ खडसे आणि त्यांच्या पत्नी मंदाकिनी गैरहजर राहिले. त्यामुळे विशेष खासदार-आमदार न्यायालयाने खडसे दाम्पत्याविरोधात शुक्रवारी अजामीनपात्र वॉरंट जारी केले. सरकारी जमीन ही पदाचा गैरवापर करून पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांच्या नावे खरेदी करून दिल्याचा आरोप एकनाथ खडसे यांच्यावर आहे. या जमिनीची बाजारभावानुसार किंमत ३१.०१ कोटी रुपये असताना ती केवळ ३.७५ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आल्याचा आरोप आहे. त्यामुळे ईडीने खडसे दाम्पत्य आणि इतरांविरोधात मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल केला आहे.

# बुलढाणा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सिंदखेड राजा

## लोणार पर्यटन व रेल्वे प्रकल्पांची गरज



मुंबई (दै. संध्या)

पश्चिम विदर्भातील बुलढाणा जिल्हा हा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक दृष्ट्या अत्यंत समृद्ध असूनही आर्थिक व सामाजिक विकासाच्या बाबतीत मागे राहिलेला आहे. या जिल्ह्यात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊंचे जन्मस्थान असलेले सिंदखेड राजा आणि जगप्रसिद्ध लोणार सरोवर ही दोन जागतिक कीर्तीची पर्यटन स्थळे आहेत. या दोन्ही स्थळांचा विकास झाला, तर जिल्ह्याचे आर्थिक चित्र बदलू शकते आणि हजारो लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांना घडविण्यात जिजामातेचे मोलाचे योगदान आहे. स्वराज्याची प्रेरणा, दूरदृष्टी आणि कणखर संस्कार यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे जिजामाता. अशा महान व्यक्तिमत्त्वाची जन्मभूमी असलेले सिंदखेड राजा हे ठिकाण अद्याप जागतिक पर्यटन नकाशावर ठळकपणे दिसत नाही, ही खंत आहे. दुसरीकडे, उल्कापातामुळे निर्माण झालेले लोणार सरोवर हे वैज्ञानिकदृष्ट्या जगातील अद्वितीय ठिकाण असूनही येथे आवश्यक सुविधा नसल्याने पर्यटकांची संख्या मर्यादित आहे.

लोणार सरोवर सुमारे ५ लाख ७० हजार वर्षांपूर्वी तयार झाले असून, खाऱ्या व क्षारीय पाण्यामुळे आणि जैवविविधतेमुळे ते जागतिक स्तरावर महत्त्वाचे मानले जाते. हे एक अधिसूचित राष्ट्रीय भू-वारसा स्थळ आहे. तरीही येथील पर्यटन विकास अपेक्षित प्रमाणात झालेला नाही. पर्यटकांसाठी निवास, वाहतूक, मार्गदर्शन केंद्रे, स्वच्छता आणि पायाभूत सुविधा यांचा अभाव जाणवतो. त्यामुळे एकदा भेट देणारे पर्यटकही पुन्हा येथे येण्यास उत्सुक राहत नाहीत.

बुलढाणा जिल्ह्याच्या विकासासाठी पर्यटन हा प्रभावी पर्याय ठरू शकतो. सिंदखेड राजा आणि लोणार ही दोन स्थळे एकमेकांपासून तुलनेने जवळ आहेत. योग्य नियोजन केल्यास ही पर्यटन साखळी तयार होऊ शकते. यामुळे स्थानिकांना रोजगार, व्यापारवाढ आणि आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणावर वाढेल. मात्र, यासाठी सर्वात महत्त्वाची गरज म्हणजे मजबूत दळणवळण व्यवस्था. या भागात रेल्वे सुविधा नसल्याने पर्यटकांना येथे पोहोचणे कठीण जाते. त्यामुळे पर्यटन विकास थांबलेला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी दोन नवीन रेल्वे मार्गांची उभारणी अत्यावश्यक असल्याची मागणी पुढे आली आहे.

पहिला प्रस्तावित रेल्वे मार्ग जालना–नागपूर असा असून, तो सिंदखेड राजा, राहेरी, किनगाव राजा, दुसरबीड, लोणार, सुलतानपूर, मेहकर, डोणगाव मार्गे नागपूरपर्यंत नेण्याची मागणी आहे. या मार्गामुळे अजिंठा–वेरूळ येथे येणाऱ्या पर्यटकांना लोणार आणि सिंदखेड राजा येथे सहज भेट देता येईल. त्यामुळे पर्यटन वाढून महसूल आणि रोजगारात मोठी वाढ होईल. दुसरा प्रस्तावित रेल्वे मार्ग जालना–खामगाव हा असून, ही जुनी मागणी अद्याप प्रलंबित आहे. या मार्गाची उभारणी झाल्यास जिल्ह्यातील शेतीमालाला बाजारपेठ मिळेल आणि स्थानिकांच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळेल. तसेच सिंदखेड राजा येथे रेल्वे जंक्शन उभारण्याचीही महत्त्वाची मागणी आहे. पर्यटन विकासासाठी केवळ योजना जाहीर करून उपयोग होत नाही; त्यासाठी सातत्याने पाठपुरावा, जनजागृती आणि लोकसहभाग आवश्यक आहे. जिल्ह्यातील सुशिक्षित नागरिक, अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन शासनाचे लक्ष वेधले, तर या भागाचा विकास शक्य आहे.

याच उद्देशाने "बुलढाणा जिल्हा विकास संघर्ष समिती, मुंबई" या सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक आणि विचारवंत यांचा यात सहभाग आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करून शासनाकडे पाठपुरावा करण्याचे काम ही समिती करणार आहे.

बुलढाणा जिल्ह्याच्या भूमिपुत्रांनी आणि नागरिकांनी या मागण्यांसाठी एकत्र येणे आवश्यक आहे. पर्यटन, रेल्वे सुविधा आणि पायाभूत विकास यांचा संगम झाला, तर बुलढाणा जिल्हा केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या पर्यटन नकाशावर ठळकपणे दिसू शकतो. जिजामातेची जन्मभूमी आणि लोणारचे वैश्विक वारसास्थळ यांना योग्य न्याय मिळाला, तर जिल्ह्याच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला नवी दिशा मिळेल.

## 'सुनील तटकरे यांच्याबाबत अभद्र टिप्पणी करू नका, अन्यथा...'

ठाणे (दै. संध्या)

उपमुख्यमंत्री पदाची शपथ सुनेत्रा अजितदादा पवार यांनी घ्यावी हा राष्ट्रवादी पक्षाचा निर्णय होता परंतु शिंदेसेनेचे नेते रामदास कदम आमचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याबाबत जी अभद्र टिप्पणी करत आहेत. आम्ही देखील रामदास कदम तुम्हाला त्याच भाषेत उत्तर देऊ शकतो. ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी विधिमंडळात आपल्यावर केलेले आरोप आणि तुमच्या कुटुंबांचे असलेले डान्सबार याबाबत आम्हाला बोलायला लावू नका. आम्ही नेहमी राष्ट्रवादी युती म्हणून पालन केले आहे. सुनील तटकरे यांनी देखील युतीधर्माचे पालन केले आहे. रामदास कदम आपण कुठलीही अभद्र टिप्पणी करू नये नाहीतर जशास तसे उत्तर देऊ, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे यांनी दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाची भूमिका पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी घेतली आणि पक्ष एनडीएमध्ये सामील झाला. त्यामुळे ज्यांना विलीनीकरणाची घाई लागली आहे त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही आनंद परांजपे यांनी केली आहे. दरम्यान वरिष्ठ पातळीवर जो काही निर्णय होईल तो आम्हाला मान्य असेल असे सांगतानाच जितेंद्र आव्हाड यांनी काय भूमिका घ्यावी याबाबत शरद पवार गटाचा निर्णय असेल असेही आनंद परांजपे यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना स्पष्ट केले.

## एससी, एसटी प्रवर्गातील असेल तरी तो सरसंघचालक होऊ शकतो

### मोहन भागवतांनी सांगितली एकमेव 'पात्रता'

मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर्वोच्च पद असलेल्या सरसंघचालक पदाबद्दल सध्या सरसंघचालक असलेल्या मोहन भागवत यांना प्रश्न विचारला गेला. त्यावेळी त्यांनी ब्राह्मण आहे म्हणून व्यक्ती सरसंघचालक होऊ शकत नाही. क्षत्रिय, वैश्य, शूद्र होऊ शकत नाही. अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्तीही सरसंघचालक होऊ शकते, असे स्पष्ट करत मोहन भागवत यांनी यासाठीची एकमेव अट सांगितली. सरसंघचालक भागवत यांनी भ्रष्टाचार आणि त्यांच्या निवृत्तीच्या प्रश्नावरही भाष्य केले. मोहन भागवत म्हणाले, "सरसंघचालक कोण बनले पाहिजे? तर कोणताही ब्राह्मण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सरसंघचालक बनू शकत नाही. कोणताही क्षत्रिय, वैश्य, शूद्र बनू शकत नाही. जो हिंदू असेल, तोच बनेल." "सरसंघचालक तो अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींमधील असेल, तरीही बनू शकतो. दुसरा कोणी असेल तरी बनू शकतो. हे बघून आमच्याकडे कार्यकर्ते नियुक्त केले जात नाहीत", अशी भूमिका सरसंघचालक मोहन भागवत यांनी मांडली. भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर भाष्य करताना सरसंघचालक भागवत यांनी एक उदाहरण दिले. ते म्हणाले, "गुरुदक्षिणा गोळा करण्यात आली. ती पडून होती. ती जमा करायची होती. विभाग प्रचारक प्रवास करू आले. ते पैसे दुसऱ्या दिवशी जिल्हा केंद्रात जमा करायचे होते आणि रात्री छात्रावासात जेवणच नव्हते." पुढे सांगताना ते म्हणाले, "मी बोललो की काय झाले? ते म्हणाले, 'धान्य संपले आहे.' विचारलं किती दिवसापासून? ते म्हणाले, 'तीन दिवसांपूर्वी.' बोललो तीन दिवसांपासून उपाशी आहात, दोन हजार रुपये इथे



पडलेले आहेत. ते म्हणाले, 'नाही. ती तर गुरुदक्षिणा आहे.' ही आहे दानत. पोटात अन्न नाहीये, पण त्या पैशाला हात लावला नाही. हे संस्कार करण्याचे काम संघ करतो. हे वाढत जाईल, तेव्हाच भ्रष्टाचार नियंत्रणात आणणं शक्य होईल", असे स्पष्ट विचार सरसंघचालक मोहन भागवत यांनी मांडले. सरसंघचालक भागवत निवृत्तीच्या प्रश्नावर बोलताना म्हणाले, "नियुक्ती होते, निवृत्ती कधीही होऊ शकते. पण, कामातून निवृत्ती आयुष्यभर होत नाही. मरेपर्यंत काम करणारे लोकही आहेत. जोपर्यंत शरीर चालेल, तोपर्यंत काम करतात. पण, कोणत्या तरी पदावर राहणे... सामान्यतः आपण असा विचार करतो की, ७५ वर्षांनंतर कोणत्याही पदाशिवाय काम करायला हवे. याला संघाची परवानगी मिळेल, तेव्हा होईल."

# आता मिळून सारे काम करुया...

मुंबई (दै. संध्या)

**महापालिकेचे कारभारी खऱ्या अर्थाने निवडले गेल्याने यापुढे 'प्रथम नागरिक' हाच अजेंडा सर्वांनी ठेवायला हवा. सारे एका विचाराचेच लोक खुर्चीवर बसल्याने गटतट विसरून सर्वांनी मिळून नाशिकसाठी झपाटून काम करावे, एवढीच अपेक्षा.**



उत्तर महाराष्ट्रातील चारपैकी तीन महापालिकांत भाजपला दणदणीत यश मिळाले असल्याने अपेक्षेप्रमाणे तीनही ठिकाणी या पक्षाचे बिनविरोध महापौर निवडून आले. काही 'अभद्र' घडण्याची शक्यता असल्याने संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या मालेगाव महापालिकेत मात्र निवडणूक झालीच. सर्वाधिक जागा मिळवणारी इस्लाम पार्टी व समाजवादी पक्षाची सेक्युलर फ्रंट प्रथमच सत्तेवर आली. इस्लाम पार्टीच्या नसरीन बानो शेख आणि समाजवादी पक्षाच्या शान-ए-हिंद अनुक्रमे महापौर व उपमहापौरपदी निवडून आल्या. शिवसेनेचे दोन्ही उमेदवार ४३ विरुद्ध १८ अशा मोठ्या फरकाने पराभूत झाले.

शिक्षणमंत्री दादा भुसे 'एमआयएम'च्या साथीने काही चमत्कार घडवतील, अशी अटकळ बांधली जात होती खरी; परंतु ही संभाव्य युती दोघांसाठीही तापदायक ठरणार होती. शिवाय, सेक्युलर फ्रंट फोडण्याची रणनीतीही अयशस्वी ठरली. काँग्रेसच्या साथीने या आघाडीने मालेगावी झेंडा फडकावल्याने शेवटी शिवसेनेला विरोधी बाकावर बसावे लागले. इकडे नाशिकमध्येही भाजपने अखेरच्या क्षणी शिवसेना शिंदे गटाला सोबत घेतल्याने निवडणूक टळून महापालिकेवर युतीचा भगवा फडकला. महापौरपदी भाजपच्या हिमगौरी आहेर-आडके, तर उपमहापौरपदी शिंदे सेनेचे विलास शिंदे यांची बिनविरोध झाल्यानंतर दोन्ही पक्षांनी एकत्रितपणे विजयाचा गुलाल उधळला. 'आवश्यकता वाटल्यास आम्ही निवडणुकीनंतर एकत्र येऊ शकतो,' ही टेप उभय पक्षांनी मतदानाआधीच वाजवून ठेवली होती. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कशाच्या बदल्यात किंवा कोणत्या अटी-शर्तींवर शिंदे गटाला सोबत घेण्यात आले, हे यथावकाश समोर येईलच; परंतु त्याआधी यानिमित्ताने या दोन्ही पक्षांत घडलेल्या 'रामायणा'चाही आढावा घ्यायला हवा.

उमेदवारी अर्जवाटपादरम्यान भाजपमध्ये मंत्री गिरीश महाजन विरुद्ध स्थानिक तीन आमदार हा उफाळलेला संघर्ष उभ्या महाराष्ट्राने पाहिला. भाजपबाबत कमालीचे नकारात्मक वातावरण असतानाही साम-दाम-दंड-भेद नीतीच्या जोरावर या पक्षाने बहुमताचा आकडा सहज पार केला. 'शंभर प्लस'चा फुगा फुटला असला, तरी मागील खेपेपेक्षा सहा अधिक जागा मिळाल्या. एकूणच, महाजन हेच पक्षाचे कर्तेकरविते आणि संकटमोचक असल्याचेही सिद्ध झाले. महापौरपदाच्या निवडीत शहराध्यक्ष सुनील केदार यांच्या आडून आमदारांनी महाजन यांच्याविरोधात मोट बांधण्याचा आणखी एक प्रयत्न केला खरा; परंतु महाजनांनी तो काही तासांतच नुसता हाणूनच पाडला नाही, तर नंतर सर्वांना 'मम' म्हणायला भाग पाडले.

प्रदेशाध्यक्षांना मोबाइलवर मेसेज पाठवून राजीनामा देणाऱ्या केदार यांना घुमजाव करावे लागले. दुसऱ्या शहराध्यक्षपदाच्या निवडीची प्रक्रिया सुरू झाल्याचा निरोप त्यांच्यापर्यंत पोचवण्यात आला होता. केवळ एका मेसेजच्या जोरावर उमराळेच्या (दिंडोरी) या गड्याने चाळीस वर्षांची कारकीर्द पणाला लावली होती. भाजपमध्ये अंतर्गत मतभेदांचे जाहीर प्रदर्शन केले जात नाही आणि तसे करणाऱ्यांना खपवून घेतले जात नाही, याचा विसर केदार यांना पडला असावा. वरिष्ठांचा रट्टा आणि त्या जोडीला पद व प्रतिष्ठा टिकविण्याच्या लालसेने त्यांनी माघार घेतली. शेवटी केवळ नाशिकच नव्हे, तर संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात 'मी ठरवेन ती पूर्वदिशा' हे महाजन यांनी दाखवून दिले.

हिमगौरी आडके-आहेर यांच्या निवडीने महापौरपदाच्या स्पर्धेत असलेल्या दीपाली कुलकर्णी, स्वाती भामरे, माधुरी बोलकर, रोहिणी पिंगळे आदींचा हिरमोड झाला. आमदार सीमा हिरे यांनी आग्रह धरल्याने बोलकर यांचेही नाव आघाडीवर होते. परंतु, एका नेत्याशी निष्ठा असली की कधी कधी नुकसानही होऊ शकते, याची प्रचीती बोलकर यांना आली. बोलकर कुटुंबीय पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांचे समर्थक मानले जातात. महाजन आणि रावल यांच्यात फार सख्य नसल्याने त्याचा फटका ओबीसी चेहरा असलेल्या बोलकर यांना बसला असावा. दुसरीकडे, उपमहापौरपदासाठी अर्ज भरलेले माजी आमदार बाळासाहेब सानप यांचे पुत्र मच्छिंद्र सानप यांना शेवटच्या सात मिनिटांत माघार घेणे भाग पडले. शिंदे सेनेसोबत युती झाल्याने त्यांचा पत्ता कट झाला. नाराज सदस्यांची आता स्थायीसह विविध समित्यांवर वर्णी लागू शकते. असो.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर अनुभवी, उच्चशिक्षित, सुसंस्कृत चेहरा भाजपला हवा होता, जो हिमगौरी आहेर-आडके यांच्या रुपाने गवसला. हिमगौरी हे साक्षात पार्वतीचे नाव आहे आणि शिवशंकराचे स्थान मानल्या जात असलेल्या ब्रह्मगिरीतून उगम पावणाऱ्या गोदावरीच्या तीरावर कुंभमेळा भरण्याच्या काळातच आडके यांची महापौरपदी निवड होणे, हासुद्धा निव्वळ योगायोग समजायचा, की आणखी काही संकेत आहेत, हा ज्याचा-त्याचा मानण्या न मानण्याचा भाग. कधी काळी शाळेच्या 'हेडगर्ल' असलेल्या हिमगौरी आडके आता शहराच्या 'हेडवुमन' बनल्या आहेत. माणसाच्या भविष्यातील कारकिर्दीची बीजे त्याच्या बालपणात रुजलेली असतात, असे म्हणतात. आडके यांच्याबाबतीत ते तंतोतंत खरे ठरले. मराठी, हिंदी अन् इंग्रजी भाषेवरही उत्तम प्रभुत्व असलेल्या हिमगौरी यांना कुंभमेळ्यात देशभर कामाचा ठसा उमटवण्याची नामी संधी आहे, ती त्या दवडणार नाहीत याची खात्री वाटते.

दिवंगत माजी मंत्री तथा काका डॉ. दौलतराव आहेर तसेच स्थायी समितीचे सभापती राहिलेले वडील बाळासाहेब आहेर यांचा राजकीय वारसा हिमगौरी यांना आहे. त्यांच्या आई प्रा. शोभना आहेर यांना २००३ च्या कुंभमेळ्यात उपमहापौरपदाची संधी मिळाली आणि मुलीने पुढचे पाऊल टाकत कुंभेळ्याच्या तोंडावर थेट महापौरपदच मिळविले! नाशिककरांना विकासकामांच्या रूपाने न्याय देऊन या संधीचे सोने केल्यास येत्या काळात विधानसभा वा लोकसभेसाठीही त्यांची दावेदारी अधिक मजबूत होऊ शकते. अर्थात, राजकारणात कधी काय होईल याचा नेम नाही. कधी कधी केवळ कर्तृत्व वा 'गॉडफादर' असूनही भागत नाही, नशीबही बलवत्तर असावे लागते, ज्याची प्रचीती उपमहापौर म्हणून निवडले गेलेल्या विलास शिंदे यांच्या रूपानेही आलीच.

ठाकरेंच्या शिवसेनेतून अंमळ उशिराने येऊनही आडनाव साधर्म्य असलेल्या या तरुण चेहऱ्यावर शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विश्वास टाकला. इतर पक्षांच्या तुलनेत छोट्या-छोट्या कार्यकर्त्यांना संधी देऊन त्यांना मोठे करण्याचे काम शिवसेनेसारख्या प्रादेशिक पक्षांनी प्राधान्याने केले. मूळ मुंगसरा येथील गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेले विलास शिंदे काही वर्षांपूर्वी रोजीरोटीसाठी सोमेश्वर येथे आले आणि 'अण्णा' म्हणून गावचे झाले. आज सोमेश्वरसह गंगापूर, आनंदवली, सातपूर या पट्ट्यात त्यांचे समर्थक आहेत. गंगापूर गावची सोयरीक असलेल्या शिंदे यांनी यापूर्वी २००३-०४ च्या कुंभमेळ्यात तत्कालीन महापौरांचे स्वीय सहायक म्हणूनही काम केल्याने त्याचा फायदा त्यांना निश्चितच होईल. नगरसेवक म्हणून तीन 'टर्म' निवडून येताना शिंदे यांनी आपल्या या 'गुरू'ने केलेल्या चुका शिताफीने टाळल्या, हे महत्त्वाचे!

**गटबाजीचा शिवसेनेला शाप :** विलास शिंदेंच्या निवडीने शिवसेना शिंदे गटातील गटबाजी चव्हाट्यावर आली, याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. शिवसेनेला गटबाजीचा शाप वगैरे आहे काय, असेच म्हणावे लागेल. जे जुन्या सेनेत घडले, तेच वा त्याचा पुढील अध्याय शिंदे सेनेत घडतो आहे. शिंदेंसह प्रवीण ऊर्फ बंटी तिदमे व राहुल दिवे यांनीही उपमहापौरपदासाठी अर्ज भरले होते. मूळ रोहिले (त्र्यंबकेश्वर) येथील असलेल्या तिदमे यांनी सिडको परिसरात जम बसवून चुंभळेंसारख्या मातब्बर कुटुंबाचा पराभव केल्याने तेही या पदाचे दावेदार मानले जात होते. प्रत्यक्षात शिंदेंना 'लॉटरी' लागल्याने नाराज झालेल्या तिदमेंनी उघडपणे शिंदेंसह उपनेते अजय बोरस्ते यांच्यावर आसूड ओढले. शिंदे गटात उशिराने आलेल्यांना सगळी पदे दिल्याचा आरोप करून महानगरप्रमुख व नगरसेवकपदाचा राजीनामा देण्याची घोषणाही त्यांनी केली. वस्तुत: काहीतरी आश्वासन मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. परंतु, तूर्तास प्रत्यक्षात माघार घेण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. पक्षनेतृत्वाने नाराजी दूर केल्याची घोषणा ते एक-दोन दिवसांत हमखास करतील. अन्यथा, पक्षाचे महत्त्वाचे पद आणि नगरसेवकपदही गेले आणि हाती उरले धुपाटणे, अशी स्थिती होईल. राजकारणात संयम राखल्यानंतर फळ मिळत असते. स्वत:चे महत्त्व दाखवून देण्यासाठी त्यांना आणखी काही काळ वाट बघावीच लागेल.

**मराठा समाजासाठी दुग्धशर्करा योग :** आपल्याकडे दुर्दैवाने आजही पदे वाटताना जातीय समीकरण लक्षात घेतले जाते. हिमगौरी आडके यांच्या रूपाने तब्बल एकवीस वर्षांनंतर मराठा समाजाला महापौरपद मिळाले. त्यात उपमहापौरपदीही मराठा उमेदवारच निवडला गेल्याने हा या समाजासाठी दुग्धशर्करा योगच ठरला. यापूर्वी १९९५-९६ मध्ये उत्तमराव ढिकले व रंजना बोराडे, तर २००२ ते २००५ या काळात दशरथ पाटील व शोभना आहेर हे मराठा उमेदवार अनुक्रमे महापौर-उपमहापौर म्हणून निवडले गेले. आता पुन्हा ही दोन्ही पदे मराठा समाजाकडे गेल्याने महापौरपदानंतर महत्त्वाच्या असलेल्या स्थायी समितीवर भाजपकडून इतर समाजाला प्राधान्य दिले जाऊ शकते. त्यासाठी एव्हाना लॉबिंग सुरू झाल्याने आणखी पंधरा दिवसांनी काय रंजक घडामोडी घडतात, याची उत्सुकता सर्वांनाच असेल.

### प्रशासनाची पडद्याआडून भूमिका

मर्जीतील महिलाच महापौरपदी आल्याने महापालिका आयुक्त मनीषा खात्रीही यांनीही सुटकेचा नि:श्वास सोडला असणार. हिमगौरी आडके यांच्यासाठी खत्री यांनीही पडद्याआडून बरीच मेहनत केल्याचे समजते. खरे-खोटे त्यांनाच ठाऊक. परंतु, आडके यांचे नाव गिरीशभाऊंच्या गळी उतरवण्यात त्यांची भूमिका मोलाची ठरली. असो. आता सारे एका विचाराचेच लोक खुर्च्यांवर बसल्याने सर्वांनी मिळून नाशिकसाठी झपाटून काम करावे, नागरिकांच्या समस्या मार्गी लावून विकासाची कास धरावी, सिंहस्थाच्या निमित्ताने कोट्यवधी भाविक येणार असल्याने शहर अधिकाधिक स्वच्छ, सुशोभित कसे राहील याची काळजी वाहावी, एवढीच अपेक्षा! अर्थात, त्याआधी गेली चार वर्षे प्रशासकीय राजवटीने करून ठेवलेले 'उद्योग', गडबड-गोंधळ निस्तरण्याचे पहिले काम त्यांना हाती घ्यावे लागणार, एवढे नक्की!

### ठाकरे सेनेला लॉटरी

शिंदे सेना सत्तेत गेल्याने उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेलासुद्धा विरोधी पक्षनेत्याच्या रूपाने लॉटरी लागणार आहे. वडनेर गावचे भूमिपुत्र असलेले व सामान्यांसाठी धावून जाणारे केशव पोरजे यांची निवड या पक्षाच्या गटनेतेपदी झालेली आहेच. तळागाळातून आलेले असल्याने पोरजे यांना नाशिकच्या नेमक्या समस्या ठाऊक आहेत. त्यामुळे ते जागल्याच्या भूमिकेत राहून सत्ताधारी गटाला जेरीस आणू शकतात. तसे घडल्यास त्याची बक्षिसी ठाकरे सेनेला पुढल्या खेपेला नक्कीच मिळू शकते. दरम्यान, इकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांत आपसात जमत नसल्याचेही उघड झाले. रंजन ठाकरे यांच्या सौभाग्यवतींची राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी निवड झाल्याने हेमलता पाटील यांनी स्वतंत्रपणे गटनोंदणी केली. आपल्याला गटनेतेपदाचा शब्द खुद्द अजितदादा पवारांनी दिला होता, असा दावा त्यांनी केला. परंतु, दादा आता स्वर्गवासी झाल्याने पाटील यांच्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांची अडचण होणार, हेही वास्तवच!

## थोडक्यात पण महत्वाचे...



## संत श्री सोपानदेवी ग्रंथ पारायणाची सांगता

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत श्री सोपानदेवी ग्रंथ पारायण मंडळ व श्रीसंत काशिनाथ महाराज मंदिर ट्रस्टच्या वतीने श्री सोपान देवी ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याची सांगता विविध धार्मिक उपक्रमांनी करण्यात आली. या सोहळ्यात सुमारे पाचशे भाविक सहभागी झाले होते. या सहभागी भाविकांना श्री सोपान देवी ग्रंथ वाटण्यात आले. श्री सोपानदेवी ग्रंथ पारायण सोहळा मंडळाचे प्रमुख हभप नारायण महाराज गोसावी व श्री संत काशिनाथ महाराज विठ्ठल मंदिर ट्रस्टचे सयाजी मोहरकर यांच्या पुढाकारातून हा सोहळा आयोजित केला होता. यावेळी जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई , श्री मार्तंड देवसंस्थान चे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे, विश्वस्त विश्वास पानसे,माजी नगराध्यक्ष रोहिदास कुंभार, उद्योजक हनुमंत बयास, रवींद्र नवगिरे,नगरसेवक योगेश जगताप, प्रशांत लाखे, स्वरुपा खोमणे , सत्यवान उबाळे, श्री बाल वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक हभप स्वप्नील महाराज काळाने उपस्थित होते . अतिशय धार्मिक वातावरणात हा पारायण सोहळा संपन्न झाला.या सोहळ्याच्या सांगता वेळी वारकरी संप्रदायातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले. यापुढे या सोहळ्याचे आयोजन श्री मार्तंड देवसंस्थान व जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने करण्यात येणार असल्याचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी सांगितले. या सोहळ्याचे नियोजन ह भ प नारायण महाराज गोसावी,ह भ प यशवंत भालेराव, ज्ञानेश्वर भोईटे गुरुजी, डॉ प्रसाद खंडागळे, प्रकाश खाडे, संजय निरगुडे, गोविंद लाखे , पुष्कर खाडे आदींनी केले.

## पुरंदरमध्ये 68.32 टक्के मतदानासह उमेदवारांचे भवितव्य मशिनबंद

सासवड (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शनिवारी, ७ फेब्रुवारी रोजी अत्यंत चुरशीने मतदान पार पडले. संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिलेल्या या निवडणुकीत एकूण ६८.३२ टक्के मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला असल्याची माहिती मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा लांडगे यांनी दिली आहे. तालुक्यात मतदानाची टक्केवारी पाहिली तर दिवे-गराडे मतदार संघाने बाजी मारली असून येथे सर्वाधिक ७४.४६ टक्के मतदान झाले आहे. त्यापाठोपाठ बेलसर-माळशिरस गटात ६९.३१ टक्के आणि वीर-भिवडी गटात ६६.०२ टक्के मतदान झाले. मात्र, नीरा-कोळविहिरे संघात मतदारांचा उत्साह काहीसा कमी दिसून आला असून तिथे सर्वात कमी म्हणजेच ६३.४४ टक्के मतदान नोंदवले गेले आहे. मतदानाची सांख्यिकी पाहता पुरुषांनी मतदानात आघाडी घेतल्याचे दिसते. तालुक्यातील एकूण ९५,२७१ पुरुष मतदारांपैकी ६७,९९७ जणांनी मतदान केले, ज्याची टक्केवारी ७१.३७ इतकी आहे. दुसरीकडे, ९४,१२९ महिला मतदारांपैकी ६१,४०८ महिलांनी केंद्रावर जाऊन आपला हक्क बजावला, त्यांची टक्केवारी ६५.२५ राहिली आहे. आज सोमवारी, ८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजल्यापासून सासवड येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत मतमोजणीला सुरुवात होणार आहे. दुपारपर्यंत सर्व जागांचे निकाल हाती येण्याची शक्यता आहे. या प्रक्रियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून सर्व तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विक्रम राजपूत यांनी दिली आहे. त्यामुळे आता पुरंदरचा 'गड' कोण सर करणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराच्या पतीवर प्राणघातक हल्ला



चाकण (दैनिक संध्या) : जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शरद आनंदराव बुट्टे पाटील यांच्या वाहनावर अज्ञात हल्लेखोरांनी केलेल्या हल्ल्यात बुट्टे हे गंभीर जखमी झाले आहेत. खेड तालुक्यातील पाईट - आंबेठाण या जिल्हा परिषद गटात शुक्रवारी (दि.६) रात्री नऊ वाजण्याच्या दरम्यान ही धक्कादायक घटना घडली. हल्लेखोरांनी केलेल्या या हल्ल्यात स्कॉर्पिओ गाडीच्या (क्र. एमएच १४ एलयू ७०७४) काचा फुटल्या. गाडी चालवत असलेल्या शरद आनंदराव बुट्टे पाटील (वय - ५०, रा. वराळे, ता. खेड) यांच्या कपाळावर दगड लागून त्यांना गंभीर जखम झाली. त्याचबरोबर त्यांच्यासोबत असलेले त्यांचे मित्र संदीप सुदाम मिरजे यांनाही किरकोळ दुखापत झाली आहे. संदीप मिरजे यांनी याप्रकरणी महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. मिरजे यांनी महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, मिरजे आणि बुट्टे पाटील हे शुक्रवारी रात्री आठ वाजण्याच्या दरम्यान खेड येथून घरी परतीच्या मार्गावर निघाले होते. त्यांचा मित्र राहुल तरडे (रा. आसखेड, ता. खेड) यांना भेटण्यासाठी बुट्टे पाटील यांच्या स्कॉर्पिओ गाडीने ते आसखेड गावात गेले होते. राहुल तरडे हे साळुंखे हॉस्पिटलमध्ये दाखल असल्याचे कळाल्याने चहापाणी करून ते दोघे रात्री पावणे नऊ वाजण्याच्या दरम्यान धामणे गावाकडे जाण्याच्या प्रयत्नात होते. यावेळी आसखेड ते धामणे रस्त्यावर शिवे परिसरात दबा धरून बसलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी बुट्टे पाटील यांच्या वाहनावर दगडफेक केली. त्यात बुट्टे पाटील हे गंभीर जखमी झाले. या घटनेची वार्ता जिल्हा परिषदेच्या या गटात समजतात संतप्त झालेल्या कार्यकर्त्यांनी हल्लेखोरांना तातडीने ताब्यात घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

## आंबेठाण येथे देशी बनावटीच्या पिस्तुलासह तरुणाला अटक

चाकण (दैनिक संध्या) : विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तूल व जिवंत काडतूस जवळ बाळगणा-या तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. खेड तालुक्यातील आंबेठाण येथे बुधवारी (दि.४) ही कारवाई करण्यात आली. विकी दीपक चव्हाण (वय - २०, रा. सोळबन वस्ती, आंबेठाण, ता. खेड) असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. गुन्हे शाखा युनिट चार यांनी याप्रकरणी उत्तर महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. विकी याच्याकडे ५० हजार रुपये किंमतीचे देशी बनावटीचे पिस्तूल व एक हजार रुपये किंमतीचे जिवंत काडतूस मिळून आले. विकी याच्या विरोधात भारतीय हत्यार कायदा तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाळुंगे एमआयडीसी पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

# भोसरीत विश्वकर्मा जयंती महोत्सव व स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**



भोसरी येथे लोहार समाज बहुउद्देशीय संस्थेचे लोहार उत्सव समिती पुणे जिल्हा यांच्या वतीने विश्वकर्मा जयंती महोत्सव व स्नेहमेळावा उत्साहात संपन्न झाला. यामध्ये गणेश महिला भजनी मंडळाचा विश्वकर्मा आराधना कार्यक्रम, प्रभू विश्वकर्मांची महाआरती, दीपप्रज्वलन, पुरस्कार सोहळा, विश्वकर्मा एंटरटेनमेंट प्रस्तुत कलाकार आपल्यातला हा मनोरंजनात्मक गाण्यांचा कार्यक्रम, महाप्रसाद,रक्तदान शिबीर, खेळ पैठणीचा कार्यक्रम, लकी ड्रॉ, अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती लोहार समाज बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शेलार यांनी दिली. या स्नेहमेळाव्याच्या उद्घाटन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी चिंचवड मनपाचे नवनिर्वाचित नगरसेवक निलेश बोराटे, निखिल बोऱ्हाडे, नगरसेविका अर्चना सस्ते, रेखा देवकर, नगरसेवक डॉ.सुहास कांबळे उपस्थित होते. तसेच लोहार समाजातील पुंडलिक सूर्यवंशी, निलेश पवार, विलास आव्हाड, दिलीप वसव, राजाराम कळसे, जेष्ठ समाजसेवक जगन शंकर लोखंडे, पत्रकार विजयराव लोखंडे, सोमनाथ तुकाराम लोखंडे, महेंद्र लोखंडे, गणेश लोखंडे, मनोज लोखंडे आदी मान्यवर व लोहार समाज बांधव उपस्थित होते. यावेळी सकाळच्या सत्रात गणेश महिला भजनी मंडळाच्या विश्वकर्मा आराधनाने कार्यक्रमाचे सुरूवात झाली. त्यानंतर गितांजली व अमित पवार, डॉ निलम व डॉ राहुल चव्हाण, भाग्यश्री व नवनाथ थोरात, रेखा व प्रभाकर चव्हाण या मानकऱ्यांच्या हस्ते प्रभू विश्वकर्मांची महाआरती पार पडली. सकाळच्या सत्राचे सूत्रसंचालन माधुरी लोहार यांनी केले. त्यानंतर उपस्थित प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून पुरस्कार वितरण कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक उत्सव समितीचे सचिव डॉ.रामदास लाड यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेचा आलेख मांडला तसेच दिवसभराच्या कार्यक्रमाचे स्वरूप मान्यवरांच्या समोर मांडले. तसेच यावेळी मान्यवरांच्या हस्ते बुलढाणा जिल्ह्यातील शिवनारायण पोपळकर यांना रोख रु ५००१, ट्रॉफी, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ असे स्वरूप असलेला जीवनगौरव पुरस्काराने यवतमाळ येथील योगिता गुजर यांना कलारत्न पुरस्कार, जळगाव येथील अनिल लोहार यांना ज्ञानज्योती पुरस्कार, तर सोलापूर जिल्ह्यातील प्रल्हाद नवघन यांना उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये पुरस्काराचे मानपत्र लेखन व वाचन डॉ.रामदास लाड यांनी केले. लोहार समाज बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शेलार यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये संस्थेच्या पुढील ध्येय धोरणांचा आढावा घेत उपस्थितांचे आभार व्यक्त केले. दुपारच्या सत्रात विश्वकर्मा एंटरटेनमेंट प्रस्तुत कलाकार आपल्यातला हा मनोरंजनात्मक गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला यामध्ये विश्वकर्मा एंटरटेनमेंटचे अध्यक्ष बाळासाहेब शेलार, उपाध्यक्ष राजश्री हरिहर, निर्देशक वसंत पोपळघट यांचे बहुमोल असे सहकार्य लाभले. कलाकार आपल्यातला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना सुर्यवंशी व मनिषा भालके यांनी केले. यावेळी महाप्रसादाचे आयोजन उत्सव समितीचे अध्यक्ष दत्तात्रय लोहार, उपाध्यक्ष संतोष रणसिंग, शाम पखाले यांनी केले. सकाळी १० ते संध्याकाळी ४ या वेळेत संपर्क प्रमुख गणेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ.रामदास लाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी लोहार समाज बहुउद्देशीय संस्थेचे अथक परिश्रम. लोहार समाज बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शेलार, उत्सव समिती अध्यक्ष दत्ता लोहार, उपाध्यक्ष औदुंबर कळसाईत, गोरक्षनाथ चव्हाण कार्याध्यक्ष संजीव दाते, सहकार्याध्यक्ष भारती शेलार, खजिनदार महेश हरिहर, सहखजिनदार रणजीत माने, प्रसिद्धी प्रमुख मनोज तुकाराम लोखंडे, संपर्क प्रमुख राजेंद्र हरेल, राजश्री हरिहर, सुलोचना आगळे, तसेच उद्योग समिती पुणे जिल्हा, भक्ती शक्ती महिला मंडळ,विश्वकर्मा एंटरटेनमेंट व ऐतिहासिक सहल समितीच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

# चाकण येथील बैलगाडा आंदोलकांची आठ वर्षानंतर निर्दोष मुक्तता

### आढळराव, बारणे, भेगडे, मोहिते, लांडगे,गोरे, सोनवणे आदींचा होता सहभाग

**चाकण (दै. संध्या)**

बैलगाडा शर्यत बंदी उठवावी, या प्रमुख मागणीसाठी चाकण येथे पुणे - नाशिक महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. त्यातील सहभागी सर्व पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. सबळ पुराव्या अभावी राजगुरुनगर न्यायालयातील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ज्योतीमाला सी. गुप्ता यांनी हा निकाल दिला. पुणे जिल्ह्यात जमावबंदी आदेश लागू असताना बैलगाडा शर्यत बंदीच्या विरोधात दि.२८ नोव्हेंबर २०१७ रोजी सर्वपक्षीय नेत्यांनी आणि बैलगाडा चालक, मालक बैलगाडा शर्यत शौकीनांनी चाकण येथे आंदोलन केले होते. यासाठी चाकण येथे तळेगाव चौकात पुणे - नाशिक राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन झाले होते. त्यावेळी पेटा कायदा हटाव, बैलगाडा शर्यत बंदी उठाव, अशी मागणी करण्यात आली होती. आंदोलनादरम्यान व्यासपीठावर चिथावनीपर भाषणे करित महामार्गावर सुमारे तीन तास वाहतुकीला अडथळा निर्माण केल्याबद्दल तत्कालीन खासदार शिवाजीराव दत्तात्रय आढळराव पाटील, खासदार श्रीरंग बारणे, माजी मंत्री संजय उर्फ बाळा विश्वनाथ भेगडे, माजी आमदार दिलीप दत्तात्रय मोहिते, आमदार महेश लांडगे, खेडचे आमदार दिवंगत सुरेश गोरे, आमदार शरद सोनवणे, दिवंगत दिगंबर बाळोबा भेगडे, देवराम लांडे, राजूशेठ जवळेकर आदींसह सुमारे साडेतीन हजार जणांवर चाकण पोलीस ठाण्यात भादंवि कलम १४३,१४९,३४१,१८८ सह मुंबई कायदा कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

चाकण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप पवार यांनी याप्रकरणी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. पोलीस उपनिरीक्षक एन.जी. पतंगे यांनी या खटल्याचा तपास केला. राजगुरुनगर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ज्योतीमाला गुप्ता यांच्यापुढे हा खटला सुरू होता. सरकारी पक्षाच्या वतीने सहाय्यक सरकारी अभियोक्ता के.डी. सोनवणे यांनी आठ साक्षीदार तपासले. या गुन्ह्यातील नेते, कार्यकर्ते आणि बैलगाडा चालक, मालक यांची बाजू अॅड. एच.एस. बगाटे, अॅड. जी.एम. होनराव, अॅड. व्ही. जी. पोखरकर, अॅड. एस. ए. काजळे, अॅड. पी. एम. परदेशी, अॅड. एस. डी. कोतवाल व अॅड. आर. बी. टाकळकर यांनी बाजू मांडली.

## राजकीय पक्षांनी जाहीर प्रचार न केल्याने पुणे जिल्हा परिषदेसाठी अवघे ६८ टक्के मतदान

**पुणे (दै. संध्या)**



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे सर्वच पक्षांकडून प्रचार न करता मतदारांच्या गाठीभेटी घेण्यावर भर देण्यात आल्याने पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी सरासरी ६८ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. गेल्या निवडणुकीत ७०.३५ टक्के मतदान झाले होते. बारामतीत दु:खाचे वातावरण असल्याने मतदारांमध्ये निरुत्साह होता. त्यामुळे सुमारे ५३ टक्केच मतदार मतदानासाठी घराबाहेर पडले.पुणे जिल्हा परिषदेचे ७३ गट आणि पंचायत समितीचे १४६ गण आहेत. त्यासाठी २९ लाख ७६ हजार ८०५ मतदार होते. त्यापैकी सरासरी ६८ टक्के मतदारांनी मतदान केले. मतदानाला सुरुवात झाल्यानंतर पहिल्या दोन तासांत ७.७४ टक्के मतदान झाले. त्यानंतर साडेअकरा वाजेपर्यंत सरासरी २१ टक्के, दुपारी दीड वाजता ३० टक्के, दुपारी साडेतीन वाजता ५१ टक्के मतदान झाले. शेवटच्या दोन तासांत मतदानाचे प्रमाण फारसे न वाढल्याने सरासरी ६८ टक्के मतदान झाले.

## लष्करी अभियांत्रिकी कार्यालयातील दोन अभियंते अटकेत

### सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**पुणे (दै. संध्या)**

खडकीतील लष्करी अभियांत्रिकी कार्यालयातील (एमईएस) दोन अभियंत्याविरुद्ध केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (सीबीआय-एसीबी) दोन लाख रुपयांची लाच मागितल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून, आरोपींचे कार्यालय आणि निवासस्थानाची झडती घेण्यात आली. तेथून एक लाख ८८ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली.

सहायक गॅरिसन अभियंता सुनील निकम, कनिष्ठ अभियंता सुरेश म्हस्के अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत एकाने सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. तक्रारदार एका खासगी कंपनीचा संचालक आहे. लष्करी अभियांत्रिकी कार्यालयाकडून देण्यात आलेली कामे ही कंपनी करते. काम पूर्ण झाल्यानंतर सहायक अभियंता निकम, म्हस्के यांच्याकडे बिल सादर करण्यात आले होते. बिल मंजूर करण्यासाठी सहा लाख रुपयांची लाच मागितली. तडजोडीत तक्रारदाराने पहिला हप्ता म्हणून दोन लाख रुपयांची लाच देण्याचे मान्य केले. त्यानंतर त्यांनी सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. सापळा लावून निकम आणि म्हस्के यांना सीबीआयच्या पथकाने पकडले. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली. सीबीआयच्या पथकाने त्यांचे कार्यालय आणि निवासस्थानाची झडती घेतली. त्यांच्याकडून एक लाख ८८ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. या प्रकरणाचा तपास करण्यात येत असल्याची माहिती सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून देण्यात आली.

# “पुरंदर विमानतळाची जागा मीच निवडली...”

### साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांचा दावा !

**पुणे (दै. संध्या)**

‘सिव्हिल एव्हिएशनचा उपाध्यक्ष असताना पुरंदरच्या विमानतळासाठी जागेची निवड मीच केली. ती नदीकाठची जागा पाहून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्याची माहिती दिली. या जगाकडे आकाशातून पाहिले तर, देवानेच विमानतळासाठी तिची निर्मिती केली असावी, असे वाटते. मुख्यमंत्र्यांनीही या जागेला मान्यता दिली,’ असा दावा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी शनिवारी केला. पुणे नगर वाचन मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे, कार्यवाह स्वाती ताडफडे आदी उपस्थित होते. याच कार्यक्रमात गिरीधर साठे यांना वाचन चळवळीतील आदर्श कार्यकर्ता पुरस्काराने गौरविण्यात आले. तर, रूपाली पाठक यांना आदर्श सामाजिक कार्यकर्ता आणि डॉ. दत्तात्रय डुंबरे यांना संत साहित्य विषयक आदर्श ग्रंथलेखन पुरस्कार प्रदान करण्यात आला.



पाटील म्हणाले,‘मराठीकडे राज्यकर्त्यांनी, शासनाने दुर्लक्ष केले. तसेच मराठी भाषकांच्या दुर्लक्षामुळेच मराठीचे नुकसान झाले. आता मात्र मराठीच्या संवर्धन संरक्षणासाठी प्रयत्न व्हायला हवेत. झेंडा कोणताही असो त्याचा दांडा मराठीचाच असायला हवा. ग्रंथालये विचार, संस्कृती पुढे नेतात. वाचन संस्कृती रुजवण्यासाठी इथली ग्रंथालये जपली पाहिजेत. या दुर्लक्षित घटकाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे.’

‘पटसंख्येच्या निकषावर प्राथमिक शाळा बंद करण्यात येत आहेत. मात्र, प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतच मिळाले पाहिजे. गेल्या पन्नास वर्षात मराठी शाळेतून शिकलेल्या शास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर लौकिक मिळवला. महाराष्ट्रातील आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या शास्त्रज्ञांमध्ये सुमारे ५० टक्के शास्त्रज्ञ हे जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये मराठी भाषेतून शिकले. तसेच पंच्याण्णव टक्के नोबेल पुरस्कार विजेते हे मातृभाषेतूनच शिकले. त्यामुळे पटसंख्येच्या निकषांवर प्राथमिक शाळा बंद करु नयेत,’ असेही पाटील यांनी नमूद केले.

दरम्यान, ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी मातृभाषेच्या संवर्धनासाठी एकजुटीचे आवाहन केले. त्यांनी साहित्य संमेलनातून मराठीच्या संवर्धनासाठी झालेल्या प्रयत्नांची दखलही घेतली. यंदाचे साहित्य संमेलन सर्वसामावेशक होते. या संमेलातून मराठी शाळा, मराठी भाषा आणि मराठी भाषकांच्या विविध प्रश्नांची उकल करण्यात आली. या सर्व प्रयत्नांचा उहापोह विश्वास पाटील यांनी आपल्या भाषणात केला.

‘पुणे नगर वाचन मंदिराच्या माध्यमातून मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी सातत्याने काम करण्यात येत आहे. आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वाचनसंस्कृती रुजवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. सध्या सुमारे सहा हजार वाचकवर्ग आणि सव्वा लाखांहून अधिक ग्रंथसंपदा संस्थेत उपलब्ध आहेत,’ अशी माहिती ताडफडे यांनी दिली. विविध वयोगटांसाठी स्वतंत्र पुस्तकसंग्रह उभारण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.

# हडपसर – लोणीकाळभोर – सासवड मार्ग प्रगतीपथावर

**पुणे (दै. संध्या)**




शहराच्या पूर्वेकडील उपनगरीय वाहतुकीमध्ये सुलभता आणण्यासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (महामेट्रो) प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात केली आहे. मेट्रो मार्गिका विस्तारीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत प्रस्तावित हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर बस डेपो ते सासवड रस्ता या मेट्रो उपमार्गिकांच्या संरेखन आराखड्यासाठी (डिझाइन) सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महामेट्रोकडून निविदा मागविण्यास सुरुवात झाली असून, ४ मार्चपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. गुणवत्ता आणि मूल्यमापनाच्या निकषानुसार पात्रता सिद्ध केल्यानंतर कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण होताच ४८ महिन्यांमध्ये संरेखन आराखडा तयार करण्याचे उद्दिष्ट देण्यात येणार आहे, असे महामेट्रोकडून स्पष्ट करण्यात आले.

महामेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी मार्गिकेचा विस्तार म्हणून हे दोन उपमार्ग प्रस्तावित करण्यात आले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारकडून या दोन्ही मार्गांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार हडपसर ते लोणी काळभोर (मार्गिका क्रमांक चार-ब) हा मार्ग ११.३५ किलोमीटर लांबीचा असून, त्यात दहा उन्नत स्थानके प्रस्तावित आहेत. त्याचबरोबर हडपसर बस डेपो ते सासवड रस्ता (मार्गिका क्रमांक ४-क) हा मार्ग ५.५७ किलोमीटरचा असून, यादरम्यान चार उन्नत स्थानके आहेत. दोन्ही मिळून १४ स्थानकांसह सुमारे १७ किलोमीटरचा हा विस्तार पूर्व पुण्यापासून पश्चिम पुण्यास जोडला जाणार आहे.

> शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरक्षित आणि सुलभ करण्यासाठी महामेट्रोकडून दुसऱ्या टप्प्यातील प्रस्तावित प्रकल्पांच्या विस्तारीकरणाला प्राधान्य दिले आहे. त्यानुसार हडपसर-लोणी काळभोर आणि हडपसर-सासवड हे प्रस्तावित प्रकल्प साकारण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी पावले उचलली आहेत.
>
> **- चंद्रशेखर तांबवेकर, जनसंपर्क अधिकारी, महामेट्रो, पुणे**

या प्रकल्पासाठी ‘डिटेल्ड डिझाइन कन्सल्टन्सी’ (डीडीसी) सेवांसाठी निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये स्थानकांचे सविस्तर अभियांत्रिकी संरेखन, बांधकाम नियोजन, पूर्वानुमान आणि संबंधित तांत्रिक बाबींचा समावेश आहे. याबाबत वरिष्ठ पातळीवर नुकतीच बैठक झाली असून, सल्लागाराच्या नियुक्तीनंतर प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) आणि पुढील टप्प्यांची अंमलबजावणी वेगाने करण्याचे नियोजन असल्याचे महामेट्रोच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

महामेट्रोच्या या विस्तारित प्रकल्पामुळे हडपसर, फुरसुंगी, लोणी काळभोर, सासवड परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होईल.

सध्या या मार्गावर होणारी वाहतूक कोंडी, प्रवासाचा वेळ आणि प्रदूषण यात लक्षणीय घट होईल. तसेच, पुढील टप्प्यात प्रस्तावित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत जोडणी देण्याचे नियोजन असल्याने, हा भाग शहराच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल, असा दावा महामेट्रोकडून करण्यात आला आहे.